रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २७१ । पृष्ठे ८ ▌ RGD/016/2026-28 www.krushival.in

रायगड, बुधवार, दि. ११ मार्च २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

## एलपीजी-इंधन टंचाई टाळण्यासाठी 'एस्मा' लागू

# साठेबाजांवर नजर

**देशभरात केंद्र सरकारचा कठोर निर्णय**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

मध्य आशियातील वाढत्या तणावाचे पडसाद आता भारताच्या इंधन पुरवठ्यावर उमटू लागले असून, संभाव्य एलपीजी आणि इंधन टंचाईचा धोका लक्षात घेता केंद्र सरकारने साठेबाजी रोखण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. एलपीजी सिलिंडर आणि पेट्रोलियम उत्पादनांचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी केंद्राने मंगळवारपासून देशभरात 'एस्मा' म्हणजेच 'अत्यावश्यक सेवा देखभाल कायदा' लागू केला आहे. या निर्णयामुळे इंधन पुरवठ्याशी संबंधित कर्मचारी कोणत्याही प्रकारचे आंदोलन किंवा संप करू शकणार नाहीत. युद्धजन्य परिस्थितीत एखाद्या वस्तूचा पुरवठा विस्कळीत झाला की बाजारात साठेबाजी आणि काळाबाजार वाढण्याची शक्यता असते. दरम्यान, या निर्णयामुळे साठेबाजांवर सरकारला नजर ठेवता येणार आहे. युद्धजन्य परिस्थितीत •> पान २ वर




### या कायद्याच्या कक्षेत कोणत्या सेवा येतात?

सार्वजनिक संरक्षण, स्वच्छता, जल पुरवठा, रुग्णालये आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या संबंधित सेवा एस्मा कायद्याच्या कक्षेत येतात. पेट्रोलियम, कोळसा, वीज, पोलाद आणि खनिज उत्पादन आणि वितरणाशी निगडीत असलेल्या संस्था आणि कंपन्या या कायद्याच्या कक्षेत येतात. याशिवाय, बँकिंग सेवाही एस्माच्या कार्यकक्षेत येते. सार्वजनिक वाहतूक, दळणवळण आणि खाद्यपुरवठा खरेदी आणि वितरण संबंधित सरकारी संस्थांना एस्मा कायद्याचे पालन करणे अनिवार्य असते. राज्य सरकार स्वतंत्रपणे किंवा अन्य राज्यांच्या मदतीने या कायद्याची अंमलबजावणी करु शकते.

### एलपीजी उत्पादनावर भर

सरकारच्या या निर्णयामुळे रुग्णालये आणि घरगुती वापरासाठी लागणारा गॅस वेळेवर उपलब्ध राहावा, असा प्रयत्न करण्यात आला आहे. टंचाईच्या अफवा पसरवून साठेबाजी करणाऱ्यांवरही आता सरकारची करडी नजर राहणार आहे. तसेच तेल कंपन्यांना इतर उत्पादने कमी करून एलपीजी उत्पादनावर अधिक भर देण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

### 'त्या' कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई

दरम्यान, एलपीजी वितरण व्यवस्था, पेट्रोल पंप आणि तेल कंपन्यांची कामे 'अत्यावश्यक सेवा' म्हणून घोषित करण्यात आली आहेत. कामावर येण्यास नकार देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई किंवा अटक करण्याची तरतूद या कायद्यात आहे. कच्च्या तेलाच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन देशांतर्गत उपलब्ध साठ्याचे समान वितरण व्हावे, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश असल्याचे सांगितले जात आहे.

**'कृषीवल'च्या बातमीने खळबळ**

# कळंबोली स्मशानभूमीत अघोरी कृत्यांचा संशय

**दीपक घरत**

**। पनवेल ।**

कळंबोली गावातील स्मशानभूमीत अघोरी विधीसाठी राख चोरी होत असल्याच्या संशयाची बातमी प्रसिद्ध होताच परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. 'कळंबोली स्मशानभूमीत राख चोरी' या मथळ्याखाली दैनिक कृषीवलमध्ये मंगळवारी (दि. १०) प्रसिद्ध झालेल्या बातमीनंतर नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यानंतर काही स्थानिक नागरिकांनी कृषीवलशी संपर्क साधत स्मशानभूमीत अघोरी पद्धतीने पूजा केल्याचा संशय व्यक्त करत काही धक्कादायक छायाचित्रे उपलब्ध करुन दिली आहेत.

समोर आलेल्या या छायाचित्रांमध्ये कळंबसेनर येथील स्मशानभूमी परिसरात संशयास्पद पद्धतीने पूजा साहित्य मांडलेले दिसून येत आहे. राखेच्या ढिगाऱ्याजवळ काही विचित्र चिन्हे तसेच संशयास्पद साहित्य ठेवण्यात आल्याचेही स्पष्ट दिसत असल्याने अघोरी प्रकार घडत असल्याच्या संशयाला अधिक बळ मिळाले आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, रात्री उशिरा काही अज्ञात व्यक्ती स्मशानभूमी परिसरात येत असल्याचे अनेक वेळा दिसून आले आहे. त्यामुळे स्मशानातील राख चोरी करून अघोरी विधी केले जात असल्याचा संशय अधिक गडद झाला असून, या प्रकाराबाबत परिसरात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, या गंभीर प्रकाराची प्रशासन आणि पोलिसांनी तातडीने दखल घेऊन सखोल चौकशी करावी तसेच स्मशानभूमी परिसरात सुरक्षा व्यवस्था आणि पोलीस गस्त वाढवावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

**छायाचित्रांमुळे चर्चेला उधाण**




**कृषीवल दणका**

### संशयास्पद हालचाली

स्मशानभूमी परिसरात संशयास्पद हालचाली वाढल्याचा दावा स्थानिक नागरिकांनी केला असून, या पार्श्वभूमीवर स्मशानभूमीत सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, रात्री पोलीस गस्त वाढवावी आणि राख चोरी तसेच अघोरी विधींबाबत सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

**वे|ध|क**



## नागोठण्यात बर्निंग कारचा थरार


**नागोठणे :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या आणि नागोठण्याहून रिलायन्स कंपनीकडे जाणाऱ्या रस्त्यावर सोमवारी (दि. ९) दुपारी बर्निंग कारचा थरार पाहायला मिळाला. कारला लागलेल्या आगीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात धुराचे लोट निर्माण झाले होते. इको कारला आग लागल्याचे समजताच कारमधील •> पान २ वर

# पाणी योजनांचे १३ कोटींचे वीज बिल थकीत

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागात राबविण्यात आलेल्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांचे तब्बल १३ कोटी रुपयांचे वीज बिल थकीत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या योजनांशी संबंधित सुमारे १ हजार ७५ ग्राहकांनी वीज बिलाची थकबाकी न भरल्याने त्यांचे वीज कनेक्शन खंडित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या कनेक्शनवरच अनेक पाणीपुरवठा योजना अवलंबून असल्याने वीजपुरवठा बंद झाल्यास जिल्ह्यात पाणीपुरवठ्याचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करू शकतो.

जिल्ह्यात ग्रामीण तसेच शहरी भागात महावितर विस्तृत जाळे उभे करण्यात आले आहे. लाखो ग्राहकांच्या घरापर्यंत वीज पोहोचविण्याचे काम महावितरण कंपनीमार्फत करण्यात येत आहे. घरगुती, व्यापारी तसेच औद्योगिक ग्राहकांबरोबरच विविध सार्वजनिक योजनांसाठीही वीजपुरवठा महावितरणकडूनच केला जातो.



- **१ हजार ७५ कनेक्शन खंडित होण्याच्या मार्गावर**
- **जिल्ह्यात पाणीपुरवठा संकटाची शक्यता**

जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये सार्वजनिक पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. या योजनांद्वारे विहिरी, धरणे किंवा जलसाठ्यांमधून मोटारींच्या साहाय्याने पाणी उचलून गावांपर्यंत पोहोचविले जाते. या संपूर्ण प्रक्रियेसाठी वीजपुरवठा अत्यावश्यक असतो. मात्र, अनेक योजनांच्या वीज बिलाची थकबाकी मोठ्या प्रमाणात वाढल्याचे चित्र समोर आले आहे.

महावितरणकडून मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील सुमारे १ हजार ७५ ग्राहकांनी वीज बिल भरलेले नाही. या ग्राहकांकडे एकूण १३ कोटी रुपयांची थकबाकी प्रलंबित आहे. ही रक्कम वेळेत न भरल्यास संबंधित कनेक्शन खंडित करण्याची कारवाई केली जाऊ शकते. मात्र, •> पान २ वर

# शेतघरात हुक्का विक्री

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील मानघर येथील एका शेतघरात बेकायदेशीरपणे हुक्का विक्री सुरू असल्याचा प्रकार पनवेल शहर पोलिसांनी उघडकीस आणला. याप्रकरणी सात जणांविरोधात गुन्हा दाखल केला. या शेतघरातून घटनास्थळावरून हुक्का ओढण्यासाठी वापरली जाणारे विविध साहित्य जप्त करण्यात आले. पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मानघर गावातील एका शेतघरात हुक्का पार्लर चालविला जात असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे उपनिरीक्षक दत्तात्रय देवकाते यांच्या पथकाने धाड टाकली.

# शिंदे गटाची जागा विरोधी बाकावर?

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

- **सर्वाधिक जागा जिंकूनही रायगडात सत्ता हातातून जाण्याची शक्यता**
- **भाजप-राष्ट्रवादीकडून सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग**

सर्वाधिक जागा जिंकूनही सत्ता हातातून निसटण्याची वेळ शिवसेना शिंदे गटावर येण्याची चिन्हे रायगडच्या राजकारणात दिसू लागली आहेत. रायगड जिल्हा परिषदेत अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीच्या तोंडावर भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात सत्ता स्थापनेबाबत हालचाली वेगाने सुरू असल्याची जोरदार चर्चा आहे. या समीकरणामुळे सर्वाधिक सदस्य निवडून आणलेल्या शिंदे गटाला थेट विरोधी बाकावर बसावे लागण्याची शक्यता निर्माण झाली असून, जिल्ह्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.



रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाची निवड येत्या गुरुवारी (दि.१२) जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात होणार आहे. मात्र, या निवडीपूर्वीच जिल्ह्यातील राजकीय समीकरणे झपाट्याने बदलत असल्याचे चित्र समोर येत आहे. नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत महायुतीत असतानाही शिंदे गटाने 'एकला चलो रे'ची भूमिका घेत भाजप आणि राष्ट्रवादीविरोधात स्वतंत्रपणे निवडणूक लढविली होती. प्रचारसभांमध्ये एकमेकांवर तीव्र आरोप-प्रत्यारोप झाले. शिंदे गटातील काही आमदारांनी तर राष्ट्रवादीसह भाजपच्या नेत्यांना थेट आव्हान देत आक्रमक भूमिका घेतली होती. "तटकरेंचे दिवस संपले, आता जिल्ह्यात थोरवे, दळवी आणि गोगावलेच भारी," अशा शब्दांत प्रचारसभांमध्ये जोरदार हल्लाबोल करण्यात आला होता. दरम्यान, जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाच्या मुद्द्यावरूनही राजकीय वातावरण तापले होते. आदिती तटकरे यांना पालकमंत्रीपद मिळू नये यासाठी शिंदे गटातील काही आमदारांनी विविध पातळ्यांवर हालचाली केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. या सर्व राजकीय घडामोडींमुळे आजतागायत •> पान २ वर

# गुरचरण जमिनीवर बेकायदा इमारत

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

- **अधिकाऱ्याला मारहाण तरीही सरपंचावर कारवाई नाही**
- **सात सुनावण्या होऊनही निर्णय प्रलंबित**
- **प्रशासन 'तारीख पे तारीख' देत असल्याचा तक्रारदारांचा आरोप**

तालुक्यातील विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर यांच्याविरोधातील बेकायदेशीर बांधकाम प्रकरणात प्रशासनाकडून कारवाई करण्यास विलंब होत असल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सरकारी गुरचरण जमिनीवर बेकायदा इमारत उभारल्याचे तहसीलदारांच्या सर्वेक्षणात स्पष्ट झाल्यानंतरही सरपंचपद रद्द करण्याचा निर्णय अद्याप प्रलंबित आहे.

माजी पंचायत समिती सभापती प्रणाली भोईर यांनी २९ नोव्हेंबर २०२३ रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. त्यांच्या तक्रारीनुसार सर्व्हे क्रमांक ३०/० या सरकारी गुरचरण जमिनीवर सरपंच प्रमोद भिंगारकर आणि सदस्य अनिल भोईर यांनी बेकायदेशीर बांधकाम केले आहे. त्यानंतर तत्कालीन तहसीलदार विजय पाटील यांनी केलेल्या सर्वेक्षणात संबंधित बांधकाम बेकायदा असल्याचे स्पष्ट झाले.

२४ मार्च २०२५ रोजी तहसीलदारांनी जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल सादर करून सरपंच भिंगारकर यांचे पद रद्द करण्याची शिफारस केली. त्यानंतर ३० एप्रिल २०२५ पासून जिल्हाधिकारी कार्यालयात या प्रकरणाची सुनावणी सुरू झाली. मात्र, मागील वर्षभरात तब्बल सात वेळा सुनावणी होऊनही अंतिम निर्णय देण्यात आलेला नाही. त्यामुळे प्रशासनाकडून मुद्दाम विलंब केला जात असल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. •> पान २ वर

### सर्वेक्षणावेळी नायब तहसीलदारास मारहाण

गुरचरण जमिनीवरील बेकायदा बांधकामाचे सर्वेक्षण करण्यासाठी गेलेल्या नायब तहसिलदार संजय भालेराव यांना सरपंच प्रमोद भिंगारकर यांनी मारहाण केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात सरपंचाला दोन दिवसांची पोलीस कोठडीही झाली होती. सरकारी कामात अडथळा निर्माण करून अधिकाऱ्यावर हल्ला केल्याचा आरोप असतानाही अद्याप कठोर कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

**नागरिकांनो, सावधान! बाहेर पडताना काळजी घेण्याचे आवाहन**

# रायगडला 'यलो अलर्ट'चा इशारा


**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांसाठी सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. विकासाच्या नावाखाली होणारी झाडांची कत्तल, वाढते औद्योगिकीकरण आणि सिमेंटच्या जंगलामुळे जिल्ह्यातील तापमान दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाकडून जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट' जाहीर केला आहे. बुधवारी तापमान ३२ ते ३७ अंश सेल्सिअसपर्यंत वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून, नागरिकांनी घराबाहेर पडताना विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, मंगळवारी पालघर, ठाणे आणि मुंबई या भागांसाठी 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला होता. त्यामुळे दिवसभर या भागांतील नागरिकांना प्रचंड उष्णतेचा सामना करावा लागला. त्यानंतर हवामान खात्याने पालघर, ठाणे आणि मुंबईसह रायगड जिल्ह्यासाठी बुधवारी 'यलो अलर्ट'चा इशारा दिला आहे.

उन्हाची तीव्रता लक्षात घेता शेतकऱ्यांनी शेतातील कामे सकाळी दहा वाजेपर्यंत आटोपून घ्यावीत, तसेच दिवसभरात पुरेसे पाणी पिण्याचा सल्ला आरोग्य विभागाकडून देण्यात आला आहे. सध्या जिल्ह्यात काही भागांत पाणीटंचाईची समस्या निर्माण होत असताना वाढत्या तापमानामुळे परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच जिल्ह्यातील तापमानात सातत्याने वाढ होत असून, उकाड्याची तीव्रता जाणवू लागली आहे. सतत बदलणाऱ्या हवामानामुळे नागरिकांनाही उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील काही दिवस जिल्ह्यात उन्हाचा चटका आणि उकाडा कायम राहण्याची शक्यता आहे.

उन्हाची तीव्रता वाढत असल्याने नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



**हवामान विभागाची सतर्कता; प्रशासन सज्ज**

**दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे, उन्हात जास्त वेळ फिरणे टाळावे आणि पुरेसे पाणी पिऊन शरीरातील पाण्याचे प्रमाण संतुलित ठेवावे.**

✓सहकार क्षेत्रातील विश्वासार्ह नांव
नागरी सहकारी पतसंस्था (मर्यादित) अलिबाग
आर्थिक वर्षात रु.२२७ कोटींच्या व्यवसायासह
ठेवी- रु. ५६२ कोटी + कर्जे - रु. ४३८ कोटी
एकत्रित ₹ 1000000000+
हा टप्पा पार करणारी जिल्हास्तरीय एकच एक पतसंस्था
सभासदांचा विजय असो!
▪पारदर्शकता ▪व्यावसायिकता▪सहकारिता आणि लोकशाही तत्वप्रणालीनुसार जनसेवेचे कंकण बांधलेली
सहकारी पतसंस्था म्हणजेच कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग

# शाळकरी मुलाच्या अपहरणाने पोलादपूर हादरले

## आरोपीकडून दुसऱ्यांदा बालकाचे अपहरण
## पोलिसांची शोधमोहीम सुरू

| पोलादपूर | प्रतिनिधी |

पोलादपूर तालुक्यातील क्षेत्रपाळ गावातून हायस्कूलला जाणाऱ्या १३ वर्षीय विद्यार्थ्याचे अपहरण झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून, यामुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे. क्षेत्रपाळ येथीलच एका व्यक्तीने या अल्पवयीन विद्यार्थ्याला फूस लावून नेल्याची तक्रार त्याच्या पालकांनी पोलादपूर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. विशेष म्हणजे, या आरोपीने यापूर्वीही एका अल्पवयीन बालकाचे अपहरण केले होते. त्या प्रकरणाचा खटला न्यायालयात सुरू असतानाच त्याने पुन्हा एकदा बालकाचे अपहरण केल्याचा आरोप आहे.


अपहृत बालक गौरव शिंदे | आरोपी सुरेश केरू जाधव

मिळालेल्या माहितीनुसार, क्षेत्रपाळ गावातील नरेंद्र पांडुरंग शिंदे हे सध्या कुटुंबासह नालासोपारा येथे वास्तव्यास असून तेथे दुकान चालवून उदरनिर्वाह करतात. त्यांचे दोन्ही मुलगे गौरव (१३) व राघव (३) हे आजी-आजोबांसोबत क्षेत्रपाळ येथे राहात होते. ४ मार्च रोजी सकाळी गौरव शाळेसाठी घरातून निघाला होता. त्यानंतर क्षेत्रपाळ गावातील सुरेश केरू जाधव याच्यासोबत तो पोलादपूर येथे दिसल्याची माहिती गावातील गणेश कदम यांनी मोबाईलवरून त्याच्या वडिलांना दिली.

याबाबत नरेंद्र शिंदे यांनी सुरेश जाधव याच्याशी संपर्क साधला असता गौरव त्याच्यासोबत असल्याचे त्याने कबूल केले आणि दोन तासांत घरी सोडतो, असेही सांगितले. मात्र, त्यानंतर त्याचा मोबाईल बंद येऊ लागल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली. गौरव घरी न परतल्याने शिंदे कुटुंबियांनी अखेर पोलादपूर पोलिसांकडे धाव घेत अपहरणाची तक्रार नोंदवली. तक्रार दाखल होताच पोलिसांनी तातडीने मुलगा आणि आरोपीचा शोध घेण्यासाठी मोहीम सुरू केली आहे. सहायक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सतीश पवार, पोलीस हेड कॉन्स्टेबल स्वप्नील कदम आणि पोलीस कर्मचारी सुनील कांजर तपास करत आहेत. दरम्यान, अपहृत मुलगा गौरव आणि आरोपी सुरेश जाधव यांची छायाचित्रे सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आली असून, कोणाला ते आढळल्यास पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### आरोपीचा गुन्हेगारी इतिहास

सुरेश केरू जाधव हा क्षेत्रपाळ गावातील रहिवासी असून, ट्रक चालक म्हणून काम करतो. सुमारे दहा वर्षांपूर्वी त्याने क्षेत्रपाळ येथील सचिन खुटेकर या १० वर्षीय बालकाचे अपहरण केले होते. त्याप्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल झाला होता. अपहरण केलेल्या बालकाला त्याने पाच दिवसांनंतर परत आणून सोडले होते. त्या गुन्ह्याचा खटला अद्याप न्यायालयात सुरू असतानाच जाधव याने पुन्हा एकदा १३ वर्षीय गौरव शिंदे याचे अपहरण केल्याचा आरोप असून, या घटनेमुळे पोलादपूर तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे.

## पनवेल तालुक्यातील रेशन दुकानदारांचा इशारा

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

तालुक्यातील रस्त भाव धान्य दुकानदारांनी धान्य पुरवठ्यातील अनियमिततेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत आंदोलनाचा इशारा दिला आहे. रस्त भाव धान्य दुकान व किरकोळ रॉकेल विक्रेता वेलफेअर असोसिएशन, पनवेल यांनी याबाबत रायगड जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, पनवेल तालुक्यातील रेशन दुकानदारांना दर महिन्याला नियमानुसार धान्य पुरवठा होत नसल्यामुळे मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. या प्रश्नाबाबत संबंधित अधिकारी आणि वरिष्ठांशी अनेकदा चर्चा करूनही अद्याप तो मार्गी लागलेला नसल्याचा आरोप संघटनेकडून करण्यात आला आहे. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी राजकीय प्रतिनिधी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व संबंधित अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेण्याची मागणी करण्यात आली होती.

# ई-बाईक टॅक्सी धोरणात गोंधळ
## पारदर्शकतेची मागणी

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

महाराष्ट्र ई-बाईक टॅक्सी धोरण २०२५ संदर्भात राज्यात गोंधळ आणि संभ्रम निर्माण झाल्याची टीका होत असून, शासनाने या धोरणाबाबत स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी कळंबोली येथील सामाजिक कार्यकर्ते प्रशांत रणवरे यांनी केली आहे.

राज्य शासनाने ४ जुलै २०२५ रोजी जाहीर केलेल्या या धोरणानुसार प्रवासी वाहतुकीसाठी इलेक्ट्रिक बाईकचा वापर बंधनकारक करण्यात आला असून, ॲप-आधारित कंपन्यांना परवाना घेऊन सेवा सुरू करण्याची परवानगी देण्यात आली आहे. मात्र, या धोरणाची अंमलबजावणी करताना स्पष्ट मार्गदर्शक सूचना, जनजागृती मोहीम किंवा नागरिकांसाठी माहिती उपलब्ध करून देण्यात आली नसल्याने चालक आणि नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे रणवरे यांनी सांगितले.

दरम्यान, या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार होत असतानाही किती कंपन्यांना परवाने देण्यात आले, किती ई-बाईक नोंदणीकृत आहेत आणि शासनाला किती महसूल मिळाला याबाबत माहिती जाहीर करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.


### जाहिर नोटीस

या जाहीर नोटीशीने सर्वांना कळविणेत येते की, खालील नमुद मिळकत आमचे अशिल श्रीमती आशा सुरेश सुर्वे, मयत श्रीमती विजय गोपिनाथ सुर्वे यांचे वारस श्री. हेमंत गोपिनाथ सुर्वे, श्रीमती अनिता सावंत, श्री. व मयत श्रीमती मालती नारायण सुर्वे यांचे वारस श्रीमती पौर्णिमा अभिजित पवार, श्रीमती निकिता निलेश सुर्वे, श्री.मनिष नारायण सुर्वे यांच्या वाडवडिलोपार्जित मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे - वांजळे, ता. कर्जत, जि. रायगड येथिल मिळकत**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ४० | १ | ०२-४५-८०<br>पो.ख.००-१८-००<br>एकुण ०२-६३-०० | २५-३७ |

वरील तद्ंगभूत हक्कहितसंबंध सुद्धा.

तरी सदर मिळकतीबाबत आमचे अशिलांनी दिनांक ०७/११/२०२० रोजी मा. कर्जत येथील दिवाणी न्यायाधिश क स्तर यांचे न्यायालयात रे.मु.नं.९५/२०२० असा दावा दाखल केलेला आहे. सदर मिळकतीत त्रयस्थ इसमांचे हक्क हितसंबंध निर्माण करू नये म्हणून मा.न्यायालयाने दि.०५/०३/२०२१ रोजी नि.५ चे अर्जास मनाई हुकुमाचा आदेश देखील पारीत केलेला आहे. सदर मिळकतीत आमचे अशिलांचा प्रथमदर्शनी हक्क हितसंबंध असल्याने मा.न्यायालयाने मान्य केले आहे अशी एकंदरीत वस्तुस्थिती असताना मा. न्यायालयात दावा प्रलंबित असताना प्रतिवादी गजानन विचारे व बाळाजी विचारे हे परस्पर सदरची मिळकत त्रयस्थ इसमास हस्तांतरीत करू पाहत आहेत तरी सदरची मिळकत हस्तांतरीत केलेस आमचे अशिलांचे कधीही न भरून निघणारे असे नुकसान होणार आहे तरी कोणीही त्रयस्थ इसमांनी सदर मिळकतीत स्वतः चे हक्क हितसंबंध निर्माण केलेस मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा अवमान केल्यासारखे होईल त्यामुळे येणाऱ्या दिवाणी व फौजदारी स्वरूपाच्या कारवाईस समोरे जाणे मिळकत विकत घेणाऱ्या इमसास भाग पडेल.

तरी या सावधगिरीच्या नोटीसीने तमाम जनतेस कळविणेत येते की, वरील नमुद मिळकतीत कोणीही कोणाचाही हक्कहितसंबंध, बोजा, वहिवाट, गहाण, दान, बक्षिस फरोक्त वगैरे हक्क निर्माण करू नये हे कळावे.

ता.१०/०३/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. योजना अनिल शिंदे उर्फ**
**ॲड. सौ. योजना मनिष सुर्वे**
रा.श्रीनाथ अपार्टमेंट, फ्लॅट नं.३०२,
तिसरा मजला, भैरवनाथ मंदीरासमोर,
मुद्रे(बु.), कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं.८६२४९३०९२५.


## जे काही बोलायचेय, ते १९ मार्चला शिवतीर्थावर बोलणार : राज ठाकरे



| महाड | प्रतिनिधी |

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या २० व्या वर्धापनदिनानिमित्त किल्ले रायगड येथे पक्षाची सदस्य नोंदणी मोहीम सुरू करण्यात आली. यावेळी बोलताना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी "जे काही बोलायचे आहे ते १९ मार्चला गुढीपाडव्याच्या दिवशी शिवतीर्थावरच बोलणार," असे सांगत आगामी राजकीय भूमिकेचे संकेत दिले.

या कार्यक्रमाला शर्मिला ठाकरे आणि अमित ठाकरे यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. रायगडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधीस्थळावर अभिवादन केल्यानंतर राज ठाकरे यांनी सदस्यत्व अर्जावर स्वाक्षरी करत मोहिमेचा शुभारंभ केला. यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित करताना राज ठाकरे म्हणाले की, सदस्य नोंदणी केवळ महाराष्ट्र सैनिकांपुरती मर्यादित नसून, महाराष्ट्राच्या विकासासाठी काम करू इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला या मोहिमेत सहभागी करून घ्यावे. बाजारपेठा, शाळा, महाविद्यालये, मंदिरे आणि इतर गर्दीच्या ठिकाणी स्टॉल लावून नागरिकांशी संवाद साधत सदस्य नोंदणी वाढवावी, असे आवाहन त्यांनी केले.

# पेट्रोल, डिझेलची अघोषित टंचाई?

- इराण-इस्त्रायल युद्धामुळे धास्ती
- पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांब रांगा

| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

इराण आणि इस्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचे पडसाद आता थेट रायगड जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागातही उमटू लागले आहेत. इंधनाचा तुटवडा निर्माण होईल आणि किमती गगनाला भिडतील, या भीतीने जिल्ह्यातील पेट्रोल पंपांवर वाहनधारकांच्या प्रचंड रांगा लागल्या आहेत.

काही पेट्रोल पंपावर पेट्रोलचा साठा संपल्याचे फलक झळकल्यामुळे सर्वसामान्यांमध्ये घबराट पसरली असून, अघोषित टंचाईचे सावट पाहायला मिळत आहे. 'पेट्रोल महाग होणार' या सोशल मीडियावरील अफवा आणि जागतिक परिस्थितीमुळे नागरिकांनी इंधन भरण्यासाठी एकच गर्दी केली आहे. यामुळे पंपांवरील साठा वेगाने संपत असून, नियमित पुरवठा विस्कळीत झाला आहे. अनेक नोकरदार आणि व्यावसायिक आपला दैनंदिन प्रवास कसा होणार, या काळजीत आहेत.



> युद्धाच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल व डिझेल संपेल अशी भीती नागरिकांना वाटत आहे. समाज माध्यमांवर या संदर्भात चर्चा सुरू आहेत. तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमांवरदेखील तशा स्वरूपाच्या बातम्या येत आहेत. त्यामुळे खबरदारी म्हणून लोक इंधन भरण्यासाठी गर्दी करत आहेत. यामुळे खूप ताण येत आहे. लोकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये व गोंधळून जाऊ नये. - संदीप जाधव, पेट्रोल पंप व्यवस्थापक, सुधागड

> पेट्रोलअभावी आजारी रुग्णांना दवाखान्यात नेण्यासाठी खासगी वाहने मिळणे कठीण झाले असून, आपत्कालीन सेवेवर याचा मोठा परिणाम होत आहे. काही पेट्रोल पंप चालक जाणीवपूर्वक साठा असूनही विक्री करत नसल्याची तक्रार नागरिक करत आहेत. शासनाने अशा नफेखोर पंप चालकांवर कडक कारवाई करावी. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन इंधनाचा पुरवठा सुरळीत करावा आणि टंचाई निर्माण करणाऱ्यांवर अंकुश ठेवावा, जेणेकरून सामान्य जनतेची होणारी गैरसोय थांबेल.
> - योगेश सुरावकर, नागरिक, पाली

### शंभर-दीडशे रुपयांच्या इंधनावर भागवायचे कसे?

इंधन टंचाईच्या धास्तीमुळे सध्या पेट्रोल पंपांवर इंधनाचा कोटा मर्यादित करण्यात आला आहे. अनेक पंपांवर दुचाकीस्वारांना केवळ १०० ते १५० रुपयांचेच पेट्रोल दिले जात आहे. प्रशासकीय किंवा तांत्रिक कारणास्तव पुकारलेल्या या अघोषित कपातीमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. ज्यांना कामानिमित्त लांबचा प्रवास करावा लागतो, अशा नोकरदार आणि व्यावसायिकांची मोठी गैरसोय झाली आहे.


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


# पनवेलच्या वाढत्या लोकसंख्येला 'एम्स'सारख्या रुग्णालयाची गरज
## शिवदास कांबळे यांची महापौरांकडे मागणी

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

शहर व परिसरात झपाट्याने वाढत असलेल्या लोकसंख्येमुळे नागरिकांना अत्याधुनिक आणि दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी पनवेलमध्ये 'एम्स'सारख्या उच्च दर्जाच्या रुग्णालयाची उभारणी करावी, अशी मागणी पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे समन्वयक शिवदास कांबळे यांनी महापौरांकडे केली आहे.

महापौरांना दिलेल्या पत्रात कांबळे यांनी नमूद केले की, पनवेलमध्ये आंतरराष्ट्रीय विमानतळ, रेल्वे आणि विविध मोठ्या विकास प्रकल्पांमुळे शहराची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. त्यामुळे भविष्यात नागरिकांना मोठ्या प्रमाणात उच्च दर्जाच्या आरोग्य सेवांची आवश्यकता भासणार आहे. न्युरोलॉजी, न्युरोसर्जरी, ऑन्कोलॉजी, कार्डिओलॉजीसारख्या अत्याधुनिक उपचार सुविधा पनवेलमध्ये उपलब्ध व्हाव्यात यासाठी एम्ससारखे आधुनिक रुग्णालय उभारण्याबाबत राज्य व केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा, अशी विनंतीही त्यांनी महापौरांना केली आहे.

# विद्यार्थ्यांकडून सव्वा चार लाखांचे हेरॉईन जप्त

| पनवेल | प्रतिनिधी |

तळोजा येथे दोन आठवड्यांनी एका इमारतीमधील सदनिकेत हेरॉईनचा मोठा साठा जप्त केल्यानंतर कळंबोलीत शिक्षण घेत असलेल्या दोन विद्यार्थ्यांकडून सव्वाचार लाख रूपयांचा हेरॉईन हा अमलीपदार्थांचा साठा सायंकाळी जप्त करण्यात आला. याप्रकरणी कळंबोली पोलिसांनी या दोन्ही विद्यार्थ्यांवर गुन्हा नोंदवून त्यांना अटक केली आहे.

'नशा मुक्त नवी मुंबई' ही घोषणा नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी केल्यानंतर नवी मुंबई पोलीस दलाच्या अमली पदार्थ विरोधी कक्ष आणि सर्वच पोलीस ठाण्यांनी अमली पदार्थ नष्ट करण्यासाठी कंबर कसली आहे. दोन आठवड्यांपूर्वी तळोजातील घोटकॅम्प येथील इमारतीमधून १ कोटी रूपयांचे हेरॉईन व इतर अमली पदार्थ जप्त केल्यानंतर याच कारवाईचा पुढील भाग म्हणून पंजाब राज्यातून तस्करी करणाऱ्या टोळीने कळंबोली व तळोजा येथील दोन विद्यार्थ्यांना या तस्करीत ओढले होते. याच विद्यार्थ्यांना कळंबोली पोलिसांनी मुंब्रा पनवेल महामार्गावर कळंबोली गावासमोरील लहान उड्डाणपुलाखाली ४ लाख ३७ हजार ५०० रूपयांच्या अमली पदार्थासह पकडले. या विद्यार्थ्यांचे वय २० व २५ वर्षे आहे. यांच्याकडून सहा हजार रूपयांची रोकड आणि वजनकाटा, प्लास्टीक पिशव्या सापडल्या.

अटकेत असलेला एक विद्यार्थी तळोजातील मारवा सोसायटीत, तर दुसरा कळंबोलीतील जंक्शन सोसायटीत केएल ५ या टाईपमध्ये राहतो. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांच्या पोलीस पथकाने ही कारवाई केली. तळोजा आणि कळंबोलीत सापडलेल्या अमली पदार्थांच्या तस्करीमध्ये पंजाब येथील ट्रकचालक अजूनही पोलिसांना सापडलेला नाही.


### कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**निविदा अधिसूचना**

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील माणगाव येथे प्रवासी लिफ्ट (2 नग) बसविण्याची तरतूद करणे. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डिव्हायसीईडब्ल्यू एमएनआयएलआयएफटी2025-27ए दिनांक: 11/03/2026**, **एकूण अंदाजित खर्च:** ₹ 45,73,654.79/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 11/03/2026, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 25/03/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 5 महिने (मान्सून वगळून). हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.


## पान १ वरून

### साठेबाजांवर नजर

एखाद्या वस्तूचा पुरवठा विस्कळीत झाला की बाजारात साठेबाजी आणि काळाबाजार वाढण्याची शक्यता असते. हे रोखण्यासाठी सरकारकडून या कायद्याचा आधार घेतला जातो. त्यानुसार व्यापारी किंवा विक्रेते जास्त नफ्यासाठी एलपीजी सिलिंडरचा साठा करून ठेवू शकत नाहीत. असे आढळल्यास संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे.

सरकारला या कायद्यांतर्गत वस्तूंचा साठा, वितरण आणि विक्री यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार मिळतो. तसेच जीवनावश्यक वस्तूंची कमाल विक्री किंमत निश्चित करून टंचाईच्या काळात ग्राहकांची लूट होऊ नये याचीही खबरदारी घेतली जाते.

**एस्मा कायद्याच्या कक्षेत कोणत्या सेवा येतात?**

Essential Services Maintenance Act (आवश्यक सेवा पुरवठा अधिनियम) 'एस्मा' हा कायदा भारतीय संसदेने १९६८ साली मंजूर केला होता. आपत्कालीन काळात आवश्यक सेवा आणि सुविधांचा विनाखंड पुरवठा सुरु राहावा, यादृष्टीने हा कायदा तयार करण्यात आला होता. दैनंदिन वापरात लागणाऱ्या गोष्टी आणि सेवांचा एस्मा कायद्याच्या कार्यकक्षेत समावेश होतो. संपाच्या काळात कामगारांना पुन्हा कामावर रुजू करण्यासाठी या कायद्याचा वापर केला जातो. त्यामुळे बंद आणि कर्फ्यूच्या काळातही कर्मचाऱ्यांना काम करण्यास नकार देता येत नाही.

### ...१३ कोटींचे वीज बिल थकीत

अशी कारवाई झाल्यास अनेक गावांचा पाणीपुरवठा ठप्प होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, जिल्ह्यातील धरणांमधील जलसाठाही हळूहळू कमी होत असल्याची चिंताजनक स्थिती आहे.

सध्या उपलब्ध माहितीनुसार, धरणांमध्ये केवळ सुमारे ५० टक्के जलसाठा शिल्लक राहिला आहे. त्यामुळे काही भागात आतापासूनच पाण्याची टंचाई जाणवू लागली असून, गावागावात पाणीटंचाईची भीती व्यक्त केली जात आहे. याच काळात जिल्ह्यात विविध धार्मिक उत्सव, पालख्या तसेच विवाह समारंभांची लगबग सुरू असते. अशा परिस्थितीत पाणीपुरवठ्याशी संबंधित वीज कनेक्शन खंडित झाल्यास या कार्यक्रमांवरही त्याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पाणीपुरवठा विस्कळीत झाल्यास नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागू शकते. या पार्श्वभूमीवर थकीत वीज बिल तातडीने भरून पाणीपुरवठा योजनांचा वीजपुरवठा सुरळीत ठेवावा, असे आवाहन महावितरण कंपनीकडून करण्यात आले आहे. अन्यथा येत्या काळात जिल्ह्यात पाणीपुरवठ्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### नागोठण्यात बर्निंग कारचा थरार

चालकाने प्रसंगावधान दाखवून तो स्वतः बाहेर पडल्याने सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, कारचे पूर्णतः नुकसान झाले आहे. हा अपघात सोमवारी (दि. ९) दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास घडला. ही आग नक्की कशामुळे लागली, याचे कारण समजू शकलेले नाही.

नागोठण्यातील मालक असलेली सदरची इको कार (क्र. एमएच ०२ डीजी ९९४१) ही नागोठण्याजवळील वाकण नाका येथून मुंबई-गोवा महामार्गावरून नागोठणेकडून रिलायन्स कंपनीकडे जाणाऱ्या रस्त्यावरून जात होती. ही इको कार नागोठण्यातील पेण बाजूला असलेल्या कमानीच्या थोडी पुढे आल्यानंतर या कारला कोणत्या तरी अज्ञात कारणाने अचानक आग लागली. आग लागल्याचे चालकाच्या लक्षात येताच चालक तातडीने कार बाहेर आला. मात्र, आगीने काही क्षणातच रौद्र रूप धारण केल्याने कारमध्ये असलेले गाडीचे पेपर, चालकाचे ड्रायव्हिंग लायसन व अन्य काही महत्त्वाची कागदपत्रे, ओळखपत्रे तसेच सुमारे अडीच हजार रुपयांची रोकड आणि रस्त्याच्या आजू बाजूला असलेली झाडेझुडपे या आगीत जळाल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. ही आग विझविण्यासाठी अग्निशामक दलाला बोलवण्यात आले. त्याआधी काही स्थानिक नागरिकांनी पाण्याचा टँकर बोलवून आग विझविण्यासाठी प्रयत्न केले. त्यानंतर थोड्याच वेळात इको कारला लागलेली आग विझविण्यात आली. मात्र, जर का कारमधील सीएनजी टँकचा स्फोट झाला असता, तर परिसरात मोठे नुकसान झाले असते असे बोलले जात आहे.

### शिंदे गटाची जागा विरोधी बाकावर?

रायगड जिल्हा पालकमंत्र्याविना असल्याची परिस्थिती कायम आहे.रायगड जिल्हा परिषद निवडणुकीत ५९ पैकी शिंदे गटाने २१ जागांवर विजय मिळवत सर्वाधिक सदस्य निवडून आणले. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसला १६, भाजपला १५, शिवसेना ठाकरे गटाला पाच, तर काँग्रेसला दोन जागांवर समाधान मानावे लागले. सर्वाधिक जागा मिळाल्यामुळे जिल्हा परिषद अध्यक्षपद शिंदे गटाकडेच जाणार, अशी जोरदार चर्चा निर्माण झाली होती. काही ठिकाणी त्यासंदर्भात जाहिराती आणि दावेही करण्यात आले होते. मात्र, भाजप आणि राष्ट्रवादी एकत्र येऊन सत्ता स्थापनेची शक्यता पुढे येताच शिंदे गटाचे संपूर्ण राजकीय गणित कोलमडल्याचे दिसत आहे. अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाच्या निवडीपूर्वीच सत्तेच्या समीकरणात सामील होण्यासाठी शिंदे गटातील काही आमदारांनी विविध पातळ्यांवर प्रयत्न सुरू केल्याची चर्चा आहे.

जिल्हा परिषद सत्तेत स्थान मिळावे यासाठी स्थानिक नेत्यांपासून ते राज्यस्तरीय नेत्यांपर्यंत संपर्क साधला जात असल्याची माहिती राजकीय सूत्रांकडून मिळत आहे. काही ठिकाणी मध्यस्थीचे प्रयत्न सुरू असल्याचेही सांगितले जात आहे. मात्र, सध्या भाजप आणि राष्ट्रवादीच्या संभाव्य सत्तास्थापनेच्या चर्चांमध्ये शिंदे गटाचे नाव फारसे दिसून येत नसल्याने परिस्थिती अधिकच गुंतागुंतीची बनली आहे. या दोन्ही पक्षांनी शिंदे गटाला दूर ठेवूनच सत्ता स्थापनेची रणनीती आखल्याचे संकेत राजकीय वर्तुळात मिळत आहेत.

या सर्व घडामोडींमुळे सर्वाधिक सदस्य निवडून आणूनही शिंदे गटातील सदस्यांना विरोधी बाकावर बसावे लागण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. त्यामुळे जिल्हा परिषद सत्तेचे स्वप्न पाहणाऱ्या शिंदे गटासाठी हा मोठा राजकीय धक्का ठरणार का, याकडे संपूर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### गुरचरण जमिनीवर बेकायदा इमारत

दरम्यान, सर्व्हे क्रमांक ३८/० या सरकारी गुरचरण जमिनीवर २०१३ साली ४२ सदनिका असलेली इमारत उभारण्यात आली असून त्या इमारतीतील सदनिकांची नोंदणी दुय्यम निबंधक कार्यालयात करून विक्री झाल्याचेही समोर आले आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ नुसार बेकायदेशीर बांधकाम करणारी व्यक्ती लोकसेवक म्हणून पदावर राहू शकत नाही, असे तक्रारदारांचे म्हणणे आहे.

या प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने निर्णय देऊन सरपंचपद रद्द करावे, अशी मागणी माजी सभापती प्रणाली भोईर यांनी केली आहे. मात्र, यासंदर्भात जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळू शकला नाही.

## पनवेलमध्ये दोन दिवस पाणीपुरवठा बंद

**पनवेल :** महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना पाणी पुरवठ्याबाबत महत्त्वाचे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून पाणीपुरवठा करणाऱ्या यंत्रणेची देखभाल व आवश्यक कामांमुळे गुरुवार, १२ मार्च रोजी सकाळी ९ वाजल्यापासून ते शुक्रवार, १३ मार्च रोजी रात्री ९ वाजेपर्यंत तब्बल ३६ तास पाणीपुरवठा बंद राहणार आहे. या कालावधीत शहरातील बहुतांश भागात पाणीपुरवठा बंद राहणार असला तरी काही उंच जलकुंभांमधून मर्यादित स्वरूपात पाणीपुरवठा सुरू ठेवण्यात येणार आहे. गुरुवार, १२ मार्च रोजी हरिओमनगर उंच जलकुंभ,ठाणानाका रोड उंच जलकुंभ, एचओसी उंच जलकुंभ, चौकोनी टाकी, मार्केट यार्ड उंच जलकुंभ तसेच पटेल मोहल्ला उंच जलकुंभ येथून पाणीपुरवठा सुरू राहणार आहे. मात्र, उर्वरित भागातील पाणीपुरवठा बंद राहील.तर शुक्रवार, १३ मार्च रोजी गंगाराम सिनेमा उंच जलकुंभ, भाजी मार्केट उंच जलकुंभ तसेच सर्व्हिस होद गोल उंच जलकुंभ येथून पाणीपुरवठा सुरू राहील, अशी माहिती महानगरपालिकेकडून देण्यात आली आहे. दरम्यान, पाणीपुरवठा पूर्ववत झाल्यानंतरही पुढील चार ते पाच दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी मिळणारे पाणी जपून वापरावे, पाण्याचा अपव्यय टाळावा आणि महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन शहर अभियंत्यांनी केले आहे.


### जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे भादाणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली नमुद वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीपैकी ०-१५-२० (हे.आर.) शेतजमिन मिळकत, श्री. नारायण निंगाप्पा पाटील, श्री. मिलींदकुमार चंद्रकांतभाई रावल व श्री. वैभव परशुराम राणे, यांच्या मालकीची असून, सदरील शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून सात (०७) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर ) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| भादाणे, ता.अलिबाग. | १२३ | ०-४०-५०<br>०-०२-५० पो.ख.<br>०-४३-०० एकूण | ९-८१ |

वर वर्णन केलेल्या ०-४३-०० (हे.आर.) शेतजमिन मिळकतीमधिल श्री. नारायण निंगाप्पा पाटील, श्री.मिलींदकुमार चंद्रकांतभाई रावल व श्री.वैभव परशुराम राणे यांच्या मालकीची ०-१५-२० (हे.आर), आकार रू. ३-६८ पैसे, शेतजमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : १०/०३/२०२६

सही/
**(ॲड. संजय म. भगत )**
हिराबाग सोसायटी, अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड. खरेदीदाराचे वकील



### मुरुड जंजिरा नगरपरिषद, मुरुड, रायगड
### दरपत्रक सूचना (Pre-Budgetory Notice)

मुरुड जंजिरा नगरपरिषद जि. रायगड करिता अत्याधुनिक अग्निशमन साहित्य खरेदी अंदाजपत्रक तयार करण्याच्या दृष्टीने google Drive https://drive.google.com/drive/folders/1EuSHritxn87lwCKffpbLfrYkuxjlX-jx?usp=sharing लिंक मध्ये नमुद असलेल्या अग्निशमन विभागाकरिता आवश्यक असणाऱ्या साहित्याचे दरपत्रक (शासकीय दरसूची मध्ये सदर प्रणालीचा दर समाविष्ट नसल्यामुळे) मागविण्यात येत आहे.

तरी दि.११/०३/२०२६ ते दि. १७/०३/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मुरुड जंजिरा नगरपरिषद कार्यालय, मुरुड येथे किंवा co.murudjanjira@gmail.com या इमेल आयडी वर दरपत्रक स्वीकारले जातील. सदर कामासाठी अधिक माहिती मुरुड जंजिरा नगरपरिषद येथे कार्यालयीन दिवशी वेळेत मिळेल.

जा.क्र. १०३७/आरोग्य विभाग/२०२५-२६
मुरुड जंजिरा नगरपरिषद
दि.१०/०३/२०२६

सही/-
**मुख्याधिकारी**
**मुरुड जंजिरा नगरपरिषद**

# निवडक



## श्री सदस्यांकडून वृक्षांचे होतेय संवर्धन

**रसायनी :** श्री समर्थ सांप्रदायाच्यावतीने खालापूर, पनवेल तालुक्यातील श्री समर्थ बैठकीच्यावतीने खारपाडा येथील डोंगराळ भागात असणाऱ्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालय जिते आरटीओ हद्दीत वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. या वृक्षांचे जतन, संवर्धन व्हावे यासाठी समर्थ सांप्रदायाच्यावतीने कोन श्री समर्थ बैठकीच्या अंतर्गत येणाऱ्या मोहोपाडा श्री समर्थ बैठक,आपटा श्री समर्थ बैठक,चांभार्ली श्री समर्थ बैठक, भाताण श्री समर्थ बैठक,तुराडे श्री समर्थ बैठक व आसपासच्या श्री समर्थ बैठकीच्यावतीने दासभक्तांनी हातात फावडे, कुदळ, कोयता, विळा, पाण्याचे ड्रम घेवून शेकडो सदस्यांनी लागवड केलेल्या झाडांभोवती स्वच्छता अभियान राबविताना पहावयास मिळाले.यावेळी जांभूळ, पेरु, वड, आंबा, बदाम, उंबर, शिसव, कडुलिंब, चिंच, कांचन, पिंपळ, आशी, करंज, भेंड, गुलमोहर, काजू, कुडा, सिताफळ, सप्तकर्णी,जायफळ, हिरडा, सावर आदी जातीच्या वृक्षांभोवतालची स्वच्छता करण्यात आली आहे. या वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी खालापूर, पनवेल तालुक्यातील श्री सदस्य हजर होते.कोणी वृक्षाभोवती आळ्या करत,कोणी गवत कापत, शेणखत टाकत तर कोणी पाणी आणून वृक्षांच्या बुंध्यावर टाकत, तर कोणी वृक्षाला आधार देण्यासाठी कुंपण करत असल्याचे दृश्य पहावयास मिळाले.




## कोमसापचा स्त्री सन्मान पुरस्कार सोहळा

**पनवेल :** महिलांचे लेखन सत्याच्या जवळ जाणारे असून नव्या बदललेल्या वातावरणात महिलांचे लेखन आयुष्याची खरी बाजू दाखवते असे उद्गार कवी अरुण म्हात्रे यांनी पनवेल येथे काढले. जागतिक महिला दिनानिमित्ताने कोकण मराठी साहित्य परिषद रायगडच्यावतीने सन्मान कर्तृत्वाचा अंतर्गत स्त्री सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कोकण मराठी साहित्य परिषदेच्या रायगड जिल्ह्यातील साहित्यिक महिलांना पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.पनवेलच्या श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, सभागृह येथे झालेल्या समारंभास पनवेल महानगरपालिकेच्या उपमहापौर प्रमिला पाटील,चित्रपट नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे,नगरसेविका दर्शना भोईर,कोमसापाचे रायगडचे अध्यक्ष संजय गुंजाळ,जिल्हा प्रतिनिधी गणेश कोळी,महिला प्रमुख संध्या दिवकर,युवाशक्ती प्रमुख सिद्धेश लखमदे उपस्थित होते. चित्रपट नाट्य निर्मात्या कल्पना विलास कोठारी यांनी आजच्या या युगामध्ये स्त्रिया अनेक क्षेत्रात स्वत:चं कर्तृत्व दाखवत आहेत.स्त्रियांनी आपल्या आयुष्यामध्ये स्वतःच्या आनंदासाठी नेहमी जागृत रहावे,असा संदेश दिला.



## स्थायी समिती झाली गठीत

**पेण :** पेण नगरपालिकेची सत्ता एक हाती भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात पेणकरांनी दिली होती. दोन महिने उलटून गेले तरी, स्थायी समिती स्थापन करायला मुहुर्त मिळत नव्हता अखेर आज पेण नगरपालिकेची सर्व साधारण सभा नगरपालिकेच्या सभागृहात पार पडली. यामध्ये ६ सभापतींची निवड झाली असून यामध्ये सार्वजनिक बांधकाम व नियोजन स्मिता पेणकर, आरोग्य व विद्युत समिती निवृत्तीपाटील, पाणी पुरवठा व जलनिसारण आनंद जाधव, कर व शुल्क सुनिता जोशी, महिला व बालकल्याण कलावती शशिकांत पाटील, क्रीडा व शिक्षण आफ्रिन अखवारे यांची बिनविरोध निवड झाली असून, स्थायी समितीचे नामनिर्देशक सदस्य म्हणून अनिरूध्द पाटील यांची निवड झाली आहे. तर नगराध्यक्षा या कायमस्वरूपी स्थायी समितीच्या सभापती असतात. त्यामुळे प्रितम पाटील या स्थायी समितीच्या कायमस्वरूपी सभापती आहेत. पेणकरांना स्वतःच्या हक्काचे सरकार हवे होते. परंतु निवडणुका होऊन ही दोन महिने उलटून ते हक्काचे सरकार स्थापन होत नव्हते. त्यामुळे अनेक विकासाची कामे कासव गतीने सुरू होती. मात्र आता पेणकरांच्या हक्काचे सरकार स्थापन झाल्याने या विकासाला वेग आल्याशिवाय राहणार नाही.



## 'महिला निरोगी तर कुटुंब निरोगी'

**खांब :** कुटुंबातील महिला निरोगी असेल तर आपले कुटुंब देखील निरोगी राहते आणि आपला समाज देखील निरोगी राहतो. म्हणून तुम्ही तुमच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे, असे मत नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांनी आपले मत व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर सभापती निता हजारे, उपसभापती गौरी बारटक्के, नगरसेविका प्रियंका धनावडे, सुप्रिया जाधव, समिधा आष्टीकर, प्रतिभा कोंडे आणि ज्योती पवार उपस्थित होत्या. यावेळी त्या म्हणाल्या, हल्ली रोजच्या धकाधकीच्या जीवनात महिलांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. महिलांनी व्यायाम आणि आहार या दोन्ही गोष्टींकडे लक्ष देणे गजेचे आहे. रोह्यातील महिलांना महत्त्व पटवून दिलं की स्वतःची काळजी घेणे. ही स्वार्थीपणा असून ती स्वतःची जबाबदारी आहे. मी आपल्या कार्यक्रमाच्या व्हिडिओ आणि रिल्स नेहमी बघत असते, असे नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांनी सांगितले.

## घाण व दुर्गंधीचे साम्राज्य; पाली प्रबुद्ध नगरमधील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात

# मुख्य नाल्याचे काम रखडले

**। पाली । प्रतिनिधी ।**

प्रबुद्ध नगर परिसरात सुरू असलेल्या मुख्य नाल्याचे काम गेल्या चार महिन्यांपासून कासवगतीने सुरू असल्याने स्थानिक रहिवाशांना भीषण नरकयातना सहन कराव्या लागत आहेत. नोव्हेंबर महिन्यात सुरू झालेले हे काम फेब्रुवारी महिना संपला तरी अद्याप पूर्ण झालेले नाही. या अर्धवट कामामुळे सांडपाण्याचा निचरा होत नसून परिसरात दुर्गंधी आणि डासांचे साम्राज्य पसरले आहे.

येथील स्थानिक रहिवाशांनी सांगितले की प्रबुद्ध नगरमधील मुख्य नाल्याच्या बांधणीचे काम प्रशासकीय संमतीने सुरू करण्यात आले होते. मात्र, ठेकेदाराच्या संथ कारभारामुळे हे काम गेल्या चार महिन्यांपासून रेंगाळले आहे. सध्या या उघड्या आणि अर्धवट नाल्यात



मोठ्या प्रमाणात कचरा साठला असून सांडपाणी साचून राहत आहे. साचलेल्या पाण्यावर डास, कीटक आणि जीवजंतूंचा प्रचंड फैलाव झाला असून, याचा सर्वाधिक फटका लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना बसत आहे.

परिसरातील सांडपाण्याची व्यवस्था कोलमडल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. डासांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांची भीती निर्माण झाली आहे. वारंवार तक्रार करूनही कामाची गती वाढत नसल्याने या परिस्थितीला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल आता रहिवासी विचारत आहेत. या रखडलेल्या कामामुळे स्थानिक नागरिकांच्या जगण्याचा प्रश्न गंभीर बनला असून प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

> नोव्हेंबरपासून या नाल्याचे काम सुरू आहे, पण चार महिने उलटूनही ते पूर्ण झालेले नाही. अपूर्ण कामामुळे येथून वाट काढताना येत नाही. तसेच साचलेल्या घाणीमुळे प्रचंड दुर्गंधी आणि डासांचा त्रास सहन करावा लागतोय. घाण साचल्यामुळे लहान मुले आणि ज्येष्ठांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रशासनाने आणि संबंधित ठेकेदाराने हे काम त्वरित पूर्ण करावे, अन्यथा नागरिकांच्या आरोग्याला काही बरे-वाईट झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार? संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्यात यावी.
> –सुगंधा जाधव, रहिवासी, पाली

> नाल्याचे काम पूर्ण करण्यासंदर्भात ठेकेदारासोबत बोलणं झाला आहे. काही दिवसातच नाल्याच्या राहिलेल्या कामास सुरुवात करून काम पूर्ण करण्यात येईल.
> –सुलतान बेनसेकर, उपनगराध्यक्ष, नगरपंचायत, पाली

## भरत पाटील अध्यक्षपदी बिनविरोध

**। पनवेल । वार्ताहर ।**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख भरत पाटील यांची सहाव्यांदा रास्त भाव धान्य दुकान व किरकोळ रॉकेल विक्रेते वेलफेअर असोसिएशन पनवेलच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. रास्त भाव धान्य दुकान व किरकोळ रॉकेल विक्रेते वेलफेअर असोसिएशन पनवेल संघटनेच्या २०२५-२०३० या कालावधीसाठी करण्यात आलेली आहे. पनवेल तालुक्यातील दुकानदारांची संघटनेत सर्व पक्षाचे काम करणारे दुकानदार, पदाधिकारी व कार्यकर्ते आहेत.

# भक्तिभावात न्हाऊन निघाला बोर्लीपंचतनचा शिमगोत्सव

## चिंचबादेवीच्या निरोप पालखीने उत्सवाची सांगता

**। बोर्लीपंचतन । मकरंद जाधव ।**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन गावची ग्रामदेवता चिंचबादेवीचा होळी पौर्णिमेपासून सुरू होणारा पारंपरिक आणि प्रसिद्ध असा शिमगोत्सव यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात साजरा करण्यात आला. आठ दिवस गावात भक्ती, परंपरा आणि उत्साहाचे वातावरण अनुभवायला मिळाले. या उत्सवाची सांगता चिंचबादेवीच्या निरोप पालखी मिरवणुकीने भावपूर्ण वातावरणात करण्यात आली.

परंपरेनुसार धुलीवंदनाच्या दिवशी चिंचबादेवी पालखीतून आपल्या मुख्य मंदिरातून म्हणजेच सासरहून होळीवरील मंदिरात



म्हणजेच माहेरी येते. देवीच्या या आगमन सोहळ्याला गावात विशेष धार्मिक महत्त्व असून या दिवशी संपूर्ण बोर्लीपंचतन गाव भक्तिभावाने न्हाऊन निघते. गावातील पालखी मार्गावरील संपूर्ण रस्ता महिला दुधाने शिंपतात. प्रत्येक घरात देवीची विधिवत पूजा केली जाते आणि देवीच्या जयघोषाने वातावरण दुमदुमून जाते. देवी माहेरी आल्यानंतर पुढील पाच ते सहा दिवस गावात उत्सवाचे आणि भक्तिमय वातावरण असते. या काळात गावातील मुंबईकर चाकरमानी तसेच पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने देवीच्या दर्शनासाठी बोर्लीपंचतन येथे येतात. भाविक देवीची खणा-नारळाने ओटी भरून नवसफेड करतात तसेच आपली गाऱ्हाणी देवीसमोर मांडतात. त्यामुळे मंदिर परिसरात या दिवसांत भाविकांची मोठी गर्दी उसळलेली पाहायला मिळते.

या कालावधीत होळीवरील सभामंडपात रात्री विविध समाजांच्या वतीने नाटक, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच पारंपरिक कला सादर केल्या जातात. त्यामुळे गावात आनंद, उत्साह आणि एकोप्याचे वातावरण निर्माण होते. अखंड आगरी समाजाच्या वतीने सादर करण्यात येणारे पारंपरिक व प्रसिद्ध म्हशाचे सोंग हे शिमगोत्सवाचे खास आकर्षण ठरते.

हि सोंगे पाहण्यासाठी नागरिक उपस्थित असतात. शिमगोत्सवातील ही आगळीवेगळी परंपरा बोर्लीपंचतनच्या लोकसंस्कृतीचे आणि आगरी समाजाच्या सांस्कृतिक वारशाचे जिवंत प्रतीक मानली जाते. उत्सवाच्या सांगता दिवशी सायंकाळी चिंचबादेवीची निरोप पालखी गावातून वाजत-गाजत काढण्यात आली. गुलालाच्या उधळणीत आणि देवीच्या जयघोषात निघालेल्या या पालखी मिरवणुकीने संपूर्ण गाव दमदुमून गेले. गावातील प्रमुख ठिकाणी पालखीचे पूजन करून देवीला भावपूर्ण निरोप देण्यात आला.

# ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप निकाल जाहीर

## रायगड जिल्हा परिषद उर्दु शाळा; किंजळोली बु. शाळेच्या विद्यार्थ्यांचे यश

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड तालुक्यातील किंजळोली बु.येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेच्या विद्यार्थ्यांनी ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप एक्सामिनेशनमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आलेल्या ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप एक्झामिनेशनचे नुकतेच निकाल जाहीर झाले असून शाळेतील १ ली ते ६ वि मधील एकूनव १२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता व अभिमानाची बाब म्हणजे यामधील ११ विद्यार्थी १०० % यशासह पात्र ठरली आहेत. उत्तम गुण मिळवत शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे.

या परीक्षेत विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमता, तर्कशक्ती व सामान्य ज्ञानाची चाचणी घेतली जाते. किंजलोली जिल्हा परिषद उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांनी परिश्रम व सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर उत्तम कामगिरी करत शिक्षकांचा आणि पालकांचा अभिमान वाढवला आहे.

शाळेचे मुख्याध्यापक तसेच शिक्षकवर्ग यांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करून त्यांना स्पर्धात्मक परीक्षांसाठी तयार केले. त्यांच्या योग्य मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांनी हे यश मिळवले असल्याचे मत पालकांनी व्यक्त केले.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग तसेच ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा पुन्हा एकदा प्रत्यय आला असून पुढील काळातही विद्यार्थी अशाच प्रकारे यश संपादन करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## केंद्र उतेखोलच्या केंद्रस्तरीय गुणवत्ता विकास स्पर्धा उत्साहात

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील केंद्र उतेखोलच्या केंद्रस्तरीय गुणवत्ता विकास स्पर्धा शाळा विकास कॉलनी येथे उत्साहात संपन्न झाली. सदर स्पर्धेत केंद्रातील १३ जिल्हा परिषद शाळांनी सहभाग घेतला होता. यशस्वी विद्यार्थ्यांना व स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना उतेखोल केंद्राचे केंद्रप्रमुख यांच्याकडून बक्षिसे देण्यात आली.

या गुणवत्ता विकास स्पर्धेचे उद्घाटन केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांच्याहस्ते करण्यात आले. सदर स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ माणगाव तहसीलचे निवासी नायब तहसीलदार अरविंद घेमुड यांच्याहस्ते करण्यात आला. यावेळी पाढे पाठांतर स्पर्धा, स्पेलिंग रायटिंग स्पर्धा, प्रश्नमंजुषा आदी स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये पाढे पाठांतर स्पर्धा प्रथम क्रमांक शाळा खर्डी बु., द्वितीय क्रमांक शाळा गिरिजनवाडी, तृतीय क्रमांक शाळा कळमजे, इंग्रजी स्पेलिंग पाठांतर प्रथम बामणोली शाळा, द्वितीय गिरीजनवाडी शाळा, तृतीय विकास कॉलनी शाळा, प्रश्नमंजुषा स्पर्धा प्रथम क्रमांक शाळा विकास कॉलनी, द्वितीय क्रमांक शाळा उतेखोल, तृतीय क्रमांक शाळा चव्हाणवाडी या शाळांनी सुयश संपादन केले.

## ४० हजार रुपयांची फसवणूक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

अनोळखी इसमाने एटीएमचा कार्डचा वापर करून परस्पर खात्यातुन काढुन ४० हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. श्रुती गिरीष साखरे (वय-२६ वर्षे) हे बँक ऑफ वडोदा एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले असता एका अनोळखी इसमाने फिर्यादी यांच्या बँक ऑफ बडोदा या एटीएमचा कार्डचा वापर करून ४० हजार रुपये त्यांच्या खात्यातुन परस्पर काढले. या बाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# २४ कोटींची नळपाणी योजना गेली पाण्यात?

## निकृष्ट कामामुळे वारंवार पाईपलाईन फुटते; दोषींवर कारवाईची मागणी

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन शहरातील नागरिकांना २४ तास शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे या उद्देशाने सुमारे २४ कोटी रुपयांची नळपाणी योजना मोठ्या थाटामाटात मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करून सुरू करण्यात आली होती. ही योजना राज्याच्या मंत्री अदिती तटकरे यांच्या मतदारसंघात राबवण्यात आल्यामुळे नागरिकांच्या अपेक्षा अधिकच वाढल्या होत्या.या योजनेच्या उद्घाटनावेळी श्रीवर्धनकरांना २४ तास शुद्ध पाणी मिळेल आणि तेही तिसऱ्या मजल्यापर्यंत सहज पोहोचेल, अशी मोठी घोषणा करण्यात आली होती. या घोषणेमुळे नागरिकांमध्ये मोठ्या अपेक्षा निर्माण झाल्या होत्या.

मात्र प्रत्यक्षात ही योजना सुरू झाल्यापासून नागरिकांना दिलेल्या आश्वासनांचा पूर्णपणे फज्जा उडाल्याचे चित्र दिसत आहे. निकृष्ट दर्जाच्या कामामुळे या योजनेची पाईपलाईन वारंवार फुटत असून आतापर्यंत अंदाजे ६० ते ७० वेळा पाईपलाईन फुटल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. दरवेळी पाईपलाईन फुटल्यानंतर दुरुस्तीसाठी सुमारे ४० ते ४५ हजार रुपये खर्च येतो. म्हणजेच लाखो रुपयांचा अतिरिक्त बोजा नगरपालिकेच्या तिजोरीवर पडत आहे.कहर म्हणजे, या कामाचा ठेकेदाराला संपूर्ण बिल अदा करून त्याचे डिपॉझिटदेखील घाईघाईत परत करण्यात आले आहे. त्यामुळे आता पाईपलाईन फुटल्यानंतर होणारा सर्व खर्च हा नगरपालिकेच्या महसुलातून केला जात असून त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या खिशावर होत आहे. एका बाजूला नागरिकांना पाण्याची टंचाई सहन करावी लागत आहे, तर दुसऱ्या बाजूला त्यांच्या पैशातून निकृष्ट कामाची भरपाई केली जात आहे.या संपूर्ण प्रकरणावर श्रीवर्धन नगरपालिका गट नेते व सामाजिक कार्यकर्ते देवेंद्र भुसणे यांनी संताप व्यक्त करत गंभीर आरोप केले आहेत.

भुसणेम्हणाले,श्रीवर्धनकरांच्या पैशातून उभारलेली २४ कोटींची योजना वारंवार फुटत आहे, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. एवढ्या मोठ्या निधीतून काम होऊनही जर पाईपलाईन ६०-७० वेळा फुटत असेल, तर या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. ते पुढे म्हणाले, ही योजना मंत्री अदिती तटकरे यांच्या मतदारसंघात राबवली जात असताना अशा प्रकारे निकृष्ट काम होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. या प्रकरणात जर ठेकेदार, अभियंते किंवा कन्सल्टन्सी जबाबदार असतील तर त्यांच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे. चुकीचे इस्टीमेट बनवणाऱ्या कन्सल्टन्सीला तात्काळ ब्लॅकलिस्ट केले पाहिजे. तसेच ज्यांनी या इस्टीमेटला तांत्रिक मान्यता दिली. त्या अधिकाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे.भुसणे यांनी पुढे आरोप केला की, या प्रकरणात आम्ही आवाज उठवत आहोत. मात्र आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. लोकशाहीत प्रश्न विचारणाऱ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न होणे म्हणजे नागरिकांवर अन्याय आहे.

दरम्यान, या योजनेमुळे आता एक विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे. जुने काम निकृष्ट असल्यामुळे पुन्हा नवीन पाईपलाईन टाकण्याची वेळ येत आहे. यासाठी पुन्हा मोठ्या प्रमाणात निधी लागणार आहे, पुन्हा रस्ते खोदावे लागणार आहेत आणि पुन्हा रस्ते बनवावे लागणार आहेत. म्हणजेच नागरिकांच्या पैशांची दुहेरी नासाडी आणि नागरिकांना नाहक त्रास. विशेष म्हणजे या संपूर्ण प्रकारात सध्या पदावर असलेले नगरसेवक, नगराध्यक्ष आणि प्रशासन हेही अडचणीत सापडले असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. भुसणे यांनी नागरिकांना आवाहन करत म्हटले आहे, हा प्रश्न कोणत्याही एका पक्षाचा नाही, तर श्रीवर्धनच्या प्रत्येक नागरिकाचा आहे. त्यामुळे नागरिकांनी पक्षभेद विसरून या लढ्यात साथ द्यावी. जे कोणी दोषी असतील ठेकेदार असो, अभियंता असो किंवा अधिकारी त्यांच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे. नागरिकांच्या पैशाची होणारी लूट आम्ही सहन करणार नाही.

सध्या या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी व्हावी आणि दोषींवर कडक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## गर्द वनराई लोप पावत असल्याचा फटका | बाजारपेठांमध्ये शुकशुकाट

# माथेरानमध्ये उन्हाळ्यात मंदीच्या झळा

**मुकुंद रांजणे**
**। माथेरान ।**

माथेरानमध्ये ऐन सुट्ट्यांच्या हंगामात वाढत्या उष्णतेमुळे पर्यटकांनी पाठ फिरवली असून उष्णतेचे तापमान ३८ अंश इतके झाल्याने बहुतांश हॉटेलमधील आरक्षणे रद्द झाल्याने इथल्या पर्यटन व्यवसायावर परिणाम होताना दिसून येत आहे.

पूर्वीचे आणि आताचे माथेरान यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येत आहे. गर्द झाडी ही माथेरानची खरी ओळख हळूहळू संपुष्टात येताना दिसत आहे. गर्द वनराईमुळे हवेत गारवा होता तो आता लोप पावत चालला



आहे त्याची कारणे स्थानिकांना ठाऊक आहेत. दस्तुरीपासून रेल्वे स्टेशनपर्यंत जी रस्त्यालगत मोठमोठी जुनी झाडे आहेत ती का सुकत चालली आहेत. याकडे वनखात्याने, संयुक्त वन व्यवस्थापन समितीने लक्ष केंद्रित करणे गरजेचे बनले आहे. दरवर्षी हीच सुकलेली झाडे आणि जंगलातील झाडे अतिवृष्टीमध्ये मुळासहित उन्मळून पडत आहेत. ही झाडीच जर का भविष्यात पूर्णपणे लोप पावली तर याठिकाणी पर्यटक येणार नाहीत हे सत्य आहे. केवळ पर्यटन शेतीवर इथल्या सर्वसामान्य लोकांसह, मोलमजुरी करणारे कष्टकरी, हमाल, रिक्षा, घोडा व्यावसायिक, लॉज, हॉटेल धारकांना उदरनिर्वाहाचे साधन प्राप्त होत असते.मागील काही दिवसांपासून पूर्णपणे मंदीचा सामना रहिवाशांना करावा लागत आहे. त्यातच हवेतील उष्मा वाढत असून जवळपास ३८ पेक्षाही अधिक उष्ण तापमान अनुभवायास मिळत आहे. तुरळक पर्यटक दिसत असून बाजारपेठमध्ये शुकशुकाट दिसत आहे. माथेरानचे पर्यटन वाचविण्यासाठी आता होतकरू युवकांनी पुढाकार घेऊन परिसरात शेकडो रोपांची लागवड करून ही रोपे जगली पाहिजेत यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. प्रशासनामार्फत दरवर्षी पावसाळ्यात वृक्षारोपण दिखावा करून लाखो रुपयांची बिले काढली जातात. एकदा का वृक्षारोपण केले की नंतर त्याकडे लक्ष देण्यास कोणत्याही खात्याच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना वेळ नसतो. सध्याची परिस्थिती पाहता माथेरान हे हिल स्टेशन आहे की हॉट स्टेशन आहे, असाही प्रश्न यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.

> माथेरान सारख्या ठिकाणी एवढी उष्णता आम्ही पहिल्यांदा अनुभवली. सकाळी अकरा वाजल्यापासून उन्हाच्या उष्ण झळा सुरू झाल्यामुळे आम्ही बाहेर फिरायला जाणे टाळून हॉटेलच्या रूममध्ये आराम करणे पसंत केले.पूर्वी इथे पंखे लावण्याची आवश्यकता भासत नव्हती परंतु पावसाळ्यात सुध्दा पंखे लावावे लागतात. लोकल पब्लिकने झाडांचे आपल्या मुलांप्रमाणे संगोपन,जतन केल्यासच इथे पूर्वीसारखी थंड हवा अनुभवायला मिळेल.
> – अनुप मढवी, पर्यटक सानपाडा, मुंबई

# अपमान आणि अपमान

ट्रम्प दुसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतरच्या तेरा महिन्यात त्यांनी भारताच्या स्वाभिमानाचे तीन तेरा वाजवून टाकले आहेत. दुर्दैवाची गोष्ट अशी की, स्वतःला विश्वगुरु समजणारे आणि एरवी ५६ इंची छातीच्या गोष्टी बोलणारे नरेंद्र मोदी ट्रम्प यांच्याकडून वारंवार होणाऱ्या या अपमानांवर कायम गप्पच राहिले आहेत. ताजा अपमान पुन्हा एकवार रशियन तेलाच्या संदर्भात आहे. आखातातील युद्धाच्या स्थितीमुळे भारताला आम्ही एक महिन्यासाठी रशियाकडून तेल घ्यायला परवानगी दिली आहे असे अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेसंट यांनी चार दिवसांपूर्वी जाहीर केले. भारत हा अमेरिकेच्या मदतीवर जगणारा लॅटिन अमेरिका किंवा आफ्रिकेतला एखादा गरीब देश नव्हे. भारत हा जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेला व स्वतःची अण्वस्त्रे स्वतः तयार केलेला एक ताकदवान देश आहे. अमेरिकेतील सॉफ्टवेअर अर्थव्यवस्था आज असंख्य भारतीय इंजिनिअर्सच्या जिवावरच चालू आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. खुद्द ट्रम्प यांच्या प्रशासनात मूळ भारतीय वंशाचे असलेले अनेक जण वरिष्ठ पदावर काम करीत आहेत. यामुळे भारताचा उल्लेख करताना ट्रम्प व त्यांच्या सहकाऱ्यांनी सावधगिरी बाळगायला हवी. पण आपण काय वाट्टेल ते बोलू व करू शकतो असा त्यांचा समज झालेला असल्याने ते युरोप अमेरिकेसह सर्व जगातील नेत्यांचा याच रीतीने अपमान करीत असतात. पण भारताने याबाबत योग्य त्या रीतीने निषेध नोंदवायला हवा. पाकिस्तानवर हल्ला करताना क्षेपणास्त्रे कशी टाकाल याचा सल्ला आपल्या लष्कराला देण्यापासून ते लहान मुलांनी परिक्षा कशी द्यावी याचे ज्ञान त्यांना शिकवण्यापर्यंत मोदी सर्व काही करू शकतात. पण ट्रम्प यांचा निषेध कसा करावा याचे ज्ञान मात्र त्यांच्याकडे नाही. आजच्यापेक्षा कितीतरी गरीब असताना भारताच्या नेहरु, इंदिरा गांधींसारख्या पंतप्रधानांनी कधीही अशा प्रकारचा अपमान सहन केलेला नाही. गेल्या वर्षी ट्रम्प यांनी आधी भारतावर जुलमी प्रकारचा आयातकर लादला आणि नंतर रशियाकडून तेल खरेदी करत असल्याबद्दल आणखी वेगळा दंड केला. हेच मुळात अन्यायकारक होते. मोदींनी तेव्हाच याला प्रत्युत्तर द्यायला हवे होते. पण ते झाले नाही.

## भारताची इभ्रतही बुडाली

आता रशियाकडून तेल खरेदी करायचे की नाही हे अमेरिकेच्या परवानगीवर ठरेल हा नियम जणू आपल्याला मान्य आहे अशीच स्थिती झाली आहे. ट्रम्प यांच्या इशाऱ्यानंतर आपल्या बहुतांश कंपन्यांनी रशियाकडून तेल खरेदी करणे कमी केले. जे तेल अलिकडे आयात झाल्याचे दिसते आहे ते पूर्वीच्या करारांचा भाग होते. आता पुन्हा एक महिन्यासाठी हे तेल खरेदीची मुभा आपल्याला मिळणार आहे. ही सरळ सरळ गुलामी आहे. याबाबत काँग्रेसने टीका केल्यानंतर लाजेकाजेस्तव सरकारने आपण असे कोणाचेही बंधन मानत नाही असे सांगितले. पण सूत्रांच्या हवाल्यानुसार या बातम्या पेरण्यात आल्या. मोदी सरकारचा एकही प्रवक्ता किंवा मंत्री ठामपणे येऊन टीव्ही कॅमेऱ्यांसमोर याविषयी बोलायला तयार नाही. यापूर्वी हा विषय निघाला तेव्हा पियूष गोयल व जयशंकर हे मंत्री एकमेकांकडे बोट दाखवत होते. आणि नरेंद्र मोदी तेव्हाही गप्प होते व आताही गप्प आहेत. भारतीय जनतेच्या भल्यासाठी आपण गप्प राहिलो असे भविष्यात ते कधीतरी म्हणतील. पण बूंद से गई वो हौद से नही आती. आता भारताला ज्या रीतीने मान खाली घालायला लावली जात आहे हे १४० कोटी लोकांच्या देशाला शोभा देणारे नाही. चारच दिवसांपूर्वी अमेरिकेने आणखी एक उद्दामपणा केला. इराणची एक युद्धनौका भारतीय नौदलाच्या निमंत्रणावरून संयुक्तरीत्या सराव करण्यासाठी विशाखापट्टण इथे आली होती. ती परत जात असताना अमेरिकेने भारताच्या अगदी जवळ श्रीलंकेच्या सागरी हद्दीमध्ये तिच्यावर बाँब टाकले व तिला बुडवले. यात अनेकांचा मृत्यू झाला. काही खलाशी व नौसैनिकांना श्रीलंकेने वाचवले. हा प्रकार भारताच्या हद्दीत घडलेला नाही हे खरे आहे. पण ही नौका भारतीय निमंत्रणावरून इथे आलेली होती. ती युद्धाचा भाग नव्हती व युद्धक्षेत्रामध्येही नव्हती. अशा वेळी तिच्यावर हल्ला करणे हे पूर्णपणे अनैतिक आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांचा भंग करणारे आहे. पण अमेरिकेला आता नियम व कायद्यांची कसलीही पर्वा राहिलेली नाही. किंबहुना ते आपण मोडणार असेच अमेरिकेचे तमाम सगळे मंत्री रोज सांगत आहेत. भारताने या प्रकरणाचा किमान निषेध करण्याची गरज होती. पण मोदी सरकारने तेवढेही धाडस दाखवले नाही.

## देशाभिमानाच्या पोकळ गप्पा

या युद्धनौकेच्या मदतीसाठी आम्ही माणुसकीच्या नात्याने सर्व काही केले असे परराष्ट्रमंत्री जयशंकर आता सांगत आहेत. ते तर भारताचे कर्तव्यच होते. पण एक सार्वभौम व स्वतंत्र देश म्हणून भारताला अमरिकेचे हे कृत्य अजिबात मान्य नाही हे जाहीरपणे सांगणेही तितकेच महत्वाचे होते. हे सगळे लोक एरवी देशाभिमान, देशाचा गौरव, अमुक सहन करणार नाही वगैरे बोलत असतात. संस्कारांच्या गोष्टी करीत असतात. पण तो केवळ विरोधकांवर दादागिरी करण्यासाठी व गरीब मुस्लिमांना वगैरे त्रास देण्यासाठी असतो. अमेरिकेसमोर जर हे षंढासारखे गप्प बसत असतील तर यांच्या देशाभिमानाच्या गप्पांना शून्य अर्थ आहे. निषेध केल्यामुळे अमेरिकेने समजा भारताला शिक्षा केली असती, वाळित टाकले असते किंवा मदत थांबवली असती तर सर्व १४० कोटी जनतेने मिळून ती सहन केली असती. त्यामुळे ज्या काय अडचणी निर्माण झाल्या असत्या त्या सहन करण्यात एक शान राहिली असती. पण मोदी सरकारने सातत्याने कातडीबचावू भूमिका घेऊन भारताला अगदीच खालच्या रांगेत नेऊन बसवले आहे. इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांना मारण्यात आल्यावरही त्याबाबत भारताने तात्काळ निषेध करायला हवा होता. इराणने अण्वस्त्रे तयार केल्याचा कोणताही पुरावा नाही. अलिकडे त्या देशाने कोणावरही हल्ला केलेला नव्हता. असे असूनही अमेरिका व इस्रायलने खामेनी व अनेक वरिष्ठ मंत्री व नेत्यांना ठार मारले. हे कोणत्याच नैतिकतेला वा कायद्याला धरून नाही. याचा स्पष्ट निषेध आताच केला नाही तर भविष्यात हाच प्रकार भारताच्या बाबतही होऊ शकतो. पण भारताने पाठीचा कणा दाखवला नाही. बरेच दिवस लोटल्यावर खामेनी यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. पण तोवर व्हायचे ते नुकसान होऊन गेले होते. यापूर्वी गाझा पट्टीत ट्रम्प व इस्रायलने हैदोस घातला. सुमारे एक लाख माणसे मेली. तरीही मोदी इस्रायलला गेले आणि नेतान्याहूंसोबत आपली कशी मैत्री आहे याचे गोडवे गाऊन आले. ट्रम्प यांनाही हे मित्र म्हणतात व याच ट्रम्प यांना निवडून द्या असे भारतीय पंतप्रधानाला न शोभणारे आवाहन मोदींनी अमेरिकेत जाऊन केले होते. तरीही त्या नेतान्याहू व ट्रम्प यांनी आपली काहीही पत्रास ठेवलेली नाही.

विचार

# राष्ट्रीय सुरक्षेसाठी 'गांडीव एआय'

***'गांडीव एआय' हे प्रामुख्याने लष्करी आणि गुप्तचर संस्थांसाठी विकसित केलेले एक अत्यंत प्रगत माहिती विश्लेषण साधन आहे. मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या विदा (डेटा) संग्रहातून ते अत्यंत कमी वेळेत शत्रूच्या हालचालींचा वेध घेते. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित शिक्षण आणि विदा विश्लेषणाचे प्रगत तंत्र वापरले गेले आहे. 'गांडीव एआय' हे केवळ एक सॉफ्टवेअर नसून भारताच्या सार्वभौमत्वाचे रक्षक आहे.***




**डॉ. दीपक शिकारपूर**

भारत सरकारने राष्ट्रीय सुरक्षेला अधिक सक्षम, वेगवान आणि तंत्रज्ञानाधारित बनवण्यासाठी 'नॅटग्रिड' या राष्ट्रीय गुप्तचर जाळ्याला अधिक बळकट केले असून त्यामध्ये 'गांडीव' या उच्च अचूकतेच्या कृत्रिम बुद्धिमत्ताप्रणालीचा समावेश केला आहे. नॅटग्रिड म्हणजे देशातील विविध महत्त्वाच्या माहिती संचांना जोडणारी व्यापक विश्लेषण प्रणाली होय. आधार, पॅन, बँक खाती, मालमत्ता नोंदी, प्रवास इतिहास, दूरसंचार ग्राहक पडताळणी यासह वीसपेक्षा अधिक माहिती भांडार एकत्र आणून संशयास्पद हालचालींचे विश्लेषण करण्याचे कार्य या जाळ्यामार्फत केले जाते. आजच्या युगात युद्ध केवळ रणांगणावर लढले जात नाही, तर माहिती तंत्रज्ञान आणि सायबर अवकाशातही तितक्याच प्रबळपणे खेळले जाते. अशा बदलत्या परिस्थितीमध्ये भारताने स्वतःची संरक्षण यंत्रणा अधिक मजबूत करण्यासाठी 'गांडीव एआय'सारख्या प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांचा विकास आणि वापर करण्यास सुरुवात केली आहे. महाभारतातील अर्जुनाचे गांडीव हे धनुष्य अचूकता आणि शक्तीचे प्रतीक होते; तसेच हे एआय साधन भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी एक अभेद्य ढाल म्हणून काम करत आहे. 'गांडीव एआय' हे प्रामुख्याने लष्करी आणि गुप्तचर संस्थांसाठी विकसित केलेले एक अत्यंत प्रगत माहिती विश्लेषण साधन आहे. हे साधन मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या विदा (डेटा) संग्रहातून अत्यंत कमी वेळेत शत्रूच्या हालचालींचा वेध घेते. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित शिक्षण आणि विदा विश्लेषणाचे प्रगत तंत्र वापरले गेले आहे. 'गांडीव एआय' हे केवळ एक सॉफ्टवेअर नसून भारताच्या सार्वभौमत्वाचे रक्षक आहे.

'आत्मनिर्भर भारत' मोहिमेअंतर्गत अशा स्वदेशी साधनांची निर्मिती होणे ही अभिमानाची बाब आहे. यामुळे आपण परकीय तंत्रज्ञानावरील अवलंबित्व कमी करू शकलो आहोत. भविष्यात हे साधन अधिक प्रगत होऊन अंतराळ सुरक्षा आणि आधुनिक युद्धाच्या सर्व आघाड्यांवर भारताचे नेतृत्व करेल. राष्ट्रीय सुरक्षा ही आता केवळ बंदुकांच्या जोरावर नाही, तर बुद्धिमत्तेच्या आणि अचूक माहितीच्या जोरावर जपली जाणार आहे. 'गांडीव एआय' नव्या युगातील अस्त्र म्हणून भारताला जागतिक महासत्ता बनवण्यासाठी नक्कीच बळ देईल. गांडीव ही या जाळ्याची विचारशक्ती मानली जाते. पारंपरिक पद्धतीने वेगवेगळ्या विभागांकडील माहिती स्वतंत्र स्वरूपात साठवली जात होती. त्या माहितीमध्ये परस्परसंबंध शोधणे हे वेळखाऊ आणि कष्टसाध्य काम होते. गांडिव प्रणाली मात्र विविध स्रोतांमधील माहिती एकत्र करून त्यातील नमुने, संबंध आणि विसंगती ओळखते. त्याद्वारे एखाद्या व्यक्तीचे आर्थिक व्यवहार, प्रवासाची वारंवारता, संपर्क जाळे किंवा मालमत्तेतील बदल यांचा परस्परसंबंध तपासून संभाव्य धोक्यांचा अंदाज आधीच बांधता येतो. त्यामुळे गुन्हा घडून गेल्यानंतर कारवाई करण्याऐवजी मूळ गैरकृत्य टाळण्यासाठी उपाययोजना करता येतात.

आर्थिक गुन्हेगार सहसा अत्यंत क्लिष्ट मार्गांनी पैसे लंपास करतात. 'गांडीव एआय' अशा गुंतागुंतीच्या व्यवहारांचा मागोवा घेण्यासाठी हुशारीने कार्य करते. सर्वप्रथम ते संशयास्पद व्यवहारांचा शोध घेते. हे साधन बँकिंग प्रणालीतील लाखो व्यवहारांचे रिअल-टाइम (तात्काळ) विश्लेषण करते. एखाद्या खात्यातून अचानक होणारे मोठे व्यवहार किंवा अनोळखी ठिकाणांहून होणारे लॉगिन यावर हे साधन लक्ष ठेवते. एखादा व्यवहार सामान्य वर्तणुकीपेक्षा वेगळा वाटल्यास हे साधन त्वरित इशारा देते. त्यानंतर ते मनी लाँडरिंग प्रतिबंध करते. अवैध मार्गाने कमावलेला पैसा कायदेशीर दाखवण्यासाठी गुन्हेगार पैशांचे अनेक स्तर तयार करतात. 'गांडीव एआय' या पैशांच्या प्रवासाचा माग काढते. एका खात्यातून दुसऱ्या खात्यात जाणारे पैसे आणि त्यांच्यातील परस्परसंबंध शोधण्याकामी हे साधन अत्यंत प्रभावी आहे. त्याचबरोबर 'गांडीव एआय' क्रेडिट कार्ड आणि विमा फसवणुकीवर नियंत्रण ठेवण्याचेही काम करते. अनेकदा बनावट कागदपत्रांच्या आधारे विमा हप्ते लाटणे किंवा क्रेडिट कार्डचा चुकीचा वापर करणे असे प्रकार घडतात. 'गांडीव एआय' अर्जदाराची पार्श्वभूमी आणि जुन्या नोंदी तपासून फसवणुकीची शक्यता वर्तवते. 'गांडीव एआय' केवळ माहिती साठवत नाही, तर माहिती समजूनही घेते. 'गांडीव एआय'ची कार्यपद्धती विदा संकलन, जोखीम मूल्यांकन आणि अचूक अंदाज या तीन मुख्य स्तरांवर चालते. विदा संकलनामध्ये बँका, शेअर बाजार आणि डिजिटल पाकीट (डिजिटल वॉलेट)मधून मिळणारी माहिती संकलित केली जाते.

पुढील प्रक्रियेमध्ये जोखीम मूल्यांकनमध्ये प्रत्येक व्यवहाराला एक धोका गुणांक दिला जातो. हा गुणांक ठरावीक मर्यादेच्या पलीकडे गेल्यास संबंधित व्यवहार रोखला जातो. अचूक अंदाजात ऐतिहासिक विदा वापरून भविष्यात कोणत्या प्रकारचे सायबर हल्ले किंवा फसवणूक होऊ शकते, याचा अंदाज आधीच वर्तवला जातो. 'गांडीव एआय'मुळे बँकिंग आणि वित्तीय क्षेत्राला बरेच फायदे होतात. सविस्तर माहिती आणि त्वरित प्रतिसाद हे या प्रणालीचे मुख्य वैशिष्ट्य आहे. त्यामुळे यात फसवणूक झाल्यानंतर तपास करण्यापेक्षा ती घडत असतानाच रोखणे शक्य होते. ही प्रणाली वापरल्यामुळे अत्यंत कमी मनुष्यबळ लागते आणि वेळेतही मोठी बचत होते. एखादे काम करण्यासाठी हजारो कर्मचाऱ्यांनाही काही दिवस लागू शकतात, ते काम ही एआय प्रणाली काही सेकंदात करते. या प्रणालीमुळे मोठी अचूकता साधता येते. मानवी चुकांमुळे एखादा संशयास्पद व्यवहार नजरेतून सुटू शकतो, पण एआय सूक्ष्म विसंगतीही शोधते. शिवाय आर्थिक व्यवहार सुरक्षित झाल्यामुळे सामान्य नागरिकांचा डिजिटल प्रणालीवर विश्वास वाढतो. या प्रणालीचा उपयोग देशातील अकरा केंद्रीय संस्थांकडून केला जातो. गुप्तचर विभाग, परराष्ट्र गुप्तचर संस्था, राष्ट्रीय तपास संस्था तसेच इतर सुरक्षा यंत्रणा या जाळ्याद्वारे आवश्यक माहिती जलदगतीने प्राप्त करू शकतात. दहशतवाद, आर्थिक अपहार, सायबर गुन्हे, बनावट कागदपत्रे, मानवी तस्करी यासारख्या गुंतागुंतीच्या गुन्ह्यांमध्ये अनेकदा विविध राज्ये आणि देशांमधील दुवे आढळतात. अशा वेळी विखुरलेली माहिती एकत्र करून संपूर्ण चित्र स्पष्ट करणे अत्यंत आवश्यक असते.

गांडीव प्रणाली हीच प्रक्रिया सुलभ करते. देशात डिजिटल व्यवहार आणि ऑनलाईन सेवा वाढत असताना आर्थिक व सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वाढले आहे. लाखो कोटी रुपयांची फसवणूक, बनावट खात्यांद्वारे निधी वळवणे, आंतरराष्ट्रीय प्रवासाच्या आडून बेकायदेशीर हालचाली करणे अशा अनेक घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर नॅटग्रिडसारखी एकात्मिक माहिती प्रणाली अत्यावश्यक ठरते. एखादी संशयित व्यक्ती वेगवेगळ्या नावांनी किंवा ओळखपत्रांनी व्यवहार करत असेल तर विविध माहिती भांडारांमधील तपशील जुळवून तिची खरी ओळख निश्चित करता येते. गांडीव प्रणालीचे आणखी महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे माहितीतील सूक्ष्म नमुने शोधण्याची क्षमता. अनेकदा गुन्हेगार लहान-लहान व्यवहारांद्वारे मोठा गैरव्यवहार लपवतात. परंतु कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित विश्लेषण पद्धती अशा व्यवहारांची वारंवारता, वेळ, रक्कम आणि संबंधित व्यक्तींचे जाळे तपासून संशयास्पद व्यवहार ओळखू शकते. यामुळे तपास यंत्रणांना अधिक नेमकेपणाने कारवाई करता येते. तथापि, अशा व्यापक माहिती संकलन प्रणालीचा विचार करताना गोपनीयता आणि नागरी स्वातंत्र्य याविषयी चर्चा होणे स्वाभाविक आहे. नागरिकांची वैयक्तिक माहिती सुरक्षित राखणे, तिचा गैरवापर टाळणे आणि कायदेशीर चौकटीतच तिचा उपयोग करणे ही शासनाची जबाबदारी आहे. कठोर नियंत्रण व्यवस्था, अधिकृत प्रवेशाची मर्यादा आणि नोंदींची तपासणी या माध्यमातून पारदर्शकता राखणे आवश्यक ठरते. सुरक्षा आणि स्वातंत्र्य यांचा समतोल साधणे हे लोकशाही व्यवस्थेचे महत्त्वाचे तत्त्व आहे.

चर्चा आजची

# एमएसआयडीसीचे 'एक ना धड'...

अलिबाग तालुक्यात सध्या सुरू असलेल्या रस्ते रुंदीकरण आणि गटारांच्या काँक्रिटीकरणाच्या कामांमुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. विशेषतः अलिबाग-रोहा आणि अलिबाग-मुरुड या मार्गांवर सुरू असलेली कामे गेल्या पाच-सहा महिन्यांपासून सुरू असली तरी त्यामध्ये कोणतेही ठोस नियोजन दिसून येत नाही. त्यामुळे 'एक ना धड, भाराभर चिंध्या' अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे.

रस्त्यांचे रुंदीकरण आणि गटारांचे सिमेंट काँक्रिटीकरण ही कामे एमएसआयडीसीमार्फत केली जात आहेत. मात्र, एक-एक टप्पा पूर्ण करण्याऐवजी अनेक ठिकाणी एकाच वेळी रस्ते खोदून ठेवण्यात आले आहेत. काही ठिकाणी गटारांसाठी खणलेले खड्डे महिनोनमहिने तसेच पडून आहेत. परिणामी, स्थानिक नागरिक, नोकरदार, व्यापारी तसेच दररोज या मार्गांवरून प्रवास करणाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**नियोजनाचा पूर्ण अभाव**

काम करताना कोणतेही ठोस नियोजन दिसत नसल्याची नागरिकांची तीव्र नाराजी आहे. मन मानेल तसे खोदकाम आणि मनात येईल तसे काँक्रिटीकरण सुरू असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून येते. काही ठिकाणी मोऱ्यांचे काम सुरू करून दोन-दोन महिने उलटले तरी ते पूर्ण झालेले नाही. रस्त्यात मोठमोठे खड्डे उघडेच ठेवलेले असून, त्या ठिकाणी इशारा देणारे फलक किंवा सुरक्षा व्यवस्था नाही. त्यामुळे अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.

**अपघातात कर्मचाऱ्याचा मृत्यू**

या निष्काळजीपणाचे गंभीर परिणामही समोर आले आहेत. मुरुड तालुक्यातील सर्वे येथील रहिवासी वनविभागात कार्यरत असलेला एक कर्मचारी मोटारसायकलसह रस्त्यातील खड्ड्यात पडून जागीच मृत्युमुखी पडल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेनंतरही संबंधित विभाग किंवा ठेकेदारांकडून परिस्थितीत फारसा बदल झालेला दिसत नाही, ही अधिक चिंताजनक बाब आहे.



**राकेश लोहार**

आज त्या घरचा कर्ता पुरुष गेलाय. ज्या मुलांनी बाबा अजून पाहिलाच नाही, त्यांच्या डोक्यावरुन पित्याचे छत्र हरपलेय. पत्नीची अवस्था काय असेल? जन्मभराचा साथी तिने गमावलाय? हे सर्व पाप या विभागाचेच आहे.

**बेलकडे परिसरात पाणीपुरवठा ठप्प**

दरम्यान, अलिबाग तालुक्यातील बेलकडे येथे गटाराच्या कामासाठी केलेल्या खोदकामादरम्यान पाईपलाईन फुटल्याने येथील पाणीपुरवठा बंद पडला आहे. २० दिवस उलटूनही पाणीपुरवठा सुरू न झाल्याने नागरिक, विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. वारंवार तक्रारी करूनही ठेकेदार किंवा संबंधित विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे होते. परंतु, संबंधित प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे येथील ग्रामस्थांचे पिण्याच्या पाण्यावाचून हाल झाले. ही जबाबदारी कोणाची?

**विद्यार्थ्यांनाही फटका**

कामांच्या गोंधळामुळे वाहतूक कोंडी वाढली असून, याचा फटका विद्यार्थ्यांनाही बसला आहे. दहावी-बारावीच्या परीक्षा काळात अनेक विद्यार्थी वाहतूक कोंडीत अडकून परीक्षेला उशिरा पोहोचले किंवा त्यांना मानसिक तणावाखाली परीक्षा द्यावी लागली. विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान कोण भरून काढणार?

**पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण होतील का?**

गतवर्षी मे महिन्याच्या सुरुवातीलाच पावसाने जोरदार हजेरी लावली होती. त्या वेळी अशाच प्रकारे मुरुड तालुक्यातील साळाव ते तळेखार मार्ग चिखलमय झाल्याने नागरिकांना संपूर्ण पावसाळाभर त्रास सहन करावा लागला होता. सध्याच्या कामांची अवस्था पाहता, आगामी पावसाळ्यात आणि मार्गांवरही अशीच परिस्थिती निर्माण होण्याची भीती आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने शहाणे व्हावे, एवढीच अपेक्षा. नाहीतर अधिकारी, कर्मचारी केबिनमध्ये बसून राहतील. ठेकेदार पळून जातील, आणि त्रास मात्र स्थानिक नागरिकांना सहन करावा लागेल. त्यामुळे अशी परिस्थिती उद्‌भवू नये, म्हणून हातात घेतलेली कामे आधी पूर्ण कशी होतील, याकडे अधिकाधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

**विकासाला विरोध नाही, पण नियोजन हवे**

विकासकामांना कोणीही विरोध करत नाही. परंतु, विकासाच्या नावाखाली नागरिकांचे दैनंदिन जीवनच विस्कळीत होत असेल, तर त्या विकासाचा उपयोग काय? स्थानिक भौगोलिक परिस्थिती, हवामान आणि पावसाचा अंदाज लक्षात घेऊन आधी सुरू असलेली कामे पूर्ण करणे आणि त्यानंतरच नवीन खोदकाम सुरू करणे आवश्यक आहे. अजूनही वेळ गेलेली नाही. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून कामांना गती दिली नाही, तर आगामी पावसाळ्यात नागरिकांना चिखल, खड्डे आणि वाहतूक कोंडीच्या समस्येतून जावे लागेल, हे निश्चित. त्यामुळे संबंधित विभाग आणि ठेकेदारांनी जबाबदारीची जाणीव ठेवून परिस्थिती सुधारण्याची हीच योग्य वेळ आहे.

लोकसंसद

## "रणनीती आणि आर्थिक संतुलन"

सध्या चालू असलेल्या इराण विरुद्ध अमेरिका इजराइल या देशातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक अर्थव्यवस्था अस्थिर झाली आहे. युद्धाचा परिणाम ऊर्जा, वीज, तेल, समुद्री व्यापार, अन्नधान्य, वाहतूक, चलन,गुंतवणूक आणि पुरवठा साखळी अशा अनेक टप्प्यांवर झालेला आहे. मध्यपूर्व भाग हा जगातील तेल आणि नैसर्गिक वायू यांचा प्रमुख स्त्रोत आहे. स्ट्रेट ऑफ होर्मुझ या समुद्रधुनीतून जगातील पाचव्या भागा इतक्या कच्च्या तेलाची वाहतूक होते. या भागावर युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. हा भाग इराणच्या नियंत्रणात येत असल्याने त्याने या समुद्रधुनीतून वाहतूक बंदी केली आहे. भारतासाठी मात्र ही वाहतूक सुरू ठेवली आहे. भारत अनुमानाने ८५% कच्चे तेल आयात करतो. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती वाढल्याने भारताच्या आयात खर्च आणि व्यापारी तूट वाढवून रुपयावर दबाव आला आहे. तेल आणि नैसर्गिक वायू महाग झाल्यामुळे महागाई वाढण्याची चिन्ह आहेत. त्याचबरोबर राज्यातील केळी, कांदा, द्राक्ष, डाळिंब यांच्या निर्यातीवर परिणाम झाला आहे.अनेक ठिकाणी शेतमाल पडून आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकरी त्यामुळे मागणी करत आहे की युद्ध थांबवून आयात निर्यात सुरळीत व्हावी किंवा सरकारने नुकसान भरपाई अनुदान देऊन करावी. रशियाने तेल पुरवठा करण्याची सिद्धता दर्शवली आहे आणि तेल पुरवठा होतही आहे ही त्यातली एक चांगली गोष्ट आहे. भारताचे इराणशी चांगले ऊर्जा संबंध आहेत. भारत चे इस्रायलशी संरक्षणामध्ये सहकार्य, तर अमेरिकेशी धोरणात्मक भागीदारी आहे. तिन्ही देशांशी आपली नाळ जुळलेली आहे त्यामुळे कोणतेही वेडेवाकडे पाऊल न उचलता भारताला संतुलित भूमिका घ्यावी लागेल.

**– लीना मकरंद गाडगीळ न्यू पनवेल**

दिनविशेष

# 'छत्रपती संभाजी राजे भोसले' मराठा साम्राजाचे दुसरे छत्रपती

संभाजी राजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी किल्ले पुरंदर येथे झाला. युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांना पुत्ररत्न झाले. शिवाजी महाराजांचे संभाजी राजेंवर अपार प्रेम होते. नशीबाचे दशावतार संभाजी महाराजांनी अगदी लहानपणापासूनच भोगले. संभाजी राजे दोन वर्षांचे असताना सईबाईंचे अकाली निधन झाले. त्यानंतर त्यांचा सांभाळ राजमाता जिजाऊंनी केली. केशवभट आणि उमाजी पंडित यांनी संभाजी राजेंना उत्तम शिक्षण दिले. सुरुवातीच्या काळात त्यांची सावत्र आई सोयराबाई यांनीही त्यांच्यावर खूप माया केली. अनेक ऐतिहासिक नोंदींप्रमाणे संभाजीराजे अत्यंत देखणे आणि शूर होते. लहान असल्यापासूनच संभाजी महाराजांनी राजकारणातील डावपेच, गनिमी कावा अगदी भराभर आत्मसाद केले.

छत्रपती शिवाजी महाराज आग्रा मोहिमेवर गेले असताना त्यांनी संभाजी राजेंनाही सोबत घेतले होते. त्यावेळी संभाजी राजे अवघ्या नऊ वर्षांचे होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अनेक गोष्टी त्यांनी जवळून पाहिल्या होत्या. शिवाजी महाराज आग्र्याहून सुटल्यानंतर त्यांनी संभाजी महाराजांना मथुरेत ठेवले होते. संभाजी राजेंवर सुरक्षित स्वराज्यात आणण्यासाठी संभाजी राजेंचे निधन झाल्याची अफवा महाराजांनी पसरवून दिली. त्यानंतर २० नोव्हेंबर १६६६ रोजी अगदी सुखरूपपणे ते पुन्हा राजगडास पोहोचले. छत्रपती संभाजी महाराज हे राज्यकारभारातही अत्यंत निपूण होते. ते कुशल संघटक होते. छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे पुढे छत्रपती झाल्यावर संभाजी महाराजांनीही अष्टप्रधान मंडळाची नियुक्ती केली होती. यामध्ये पंतप्रधान म्हणून निळोपंत पिंगळे, चिटणीस म्हणून बाळाजी आवजी, सेनापती म्हणून हंबीरराव मोहिते, न्यायाधीश म्हणून प्रल्हाद निराजी, पंत सुमंत म्हणून जनार्दन पंत, पंडितराव दानाध्यक्ष म्हणून मोरेश्वर पंडितराव, पंत सचिव म्हणून आबाजी सोनदेव, पंत अमात्य म्हणून दत्ताजी पंत, पंत अमात्य म्हणून अण्णाजी दत्तो यांची नियुक्ती करण्यात आली होती. मश्री शंभो: शिवजातस्य मुद्राद्यौरिव राजते । यदं कसेविनी लेखा वतर्ते कस्यनोपरि ।।', अशी छत्रपती झाल्यावर संभाजी महाराजांची मुद्रा होती. छत्रपती शिवरायांनंतर शंभूराजे छत्रपती झाले. संभाजी महाराजांनी सरसेनापती म्हणून हंबीरराव मोहिते यांची नियुक्ती केली. सरनौबत हंबीरराव मोहिते यांनी अचानक बुऱ्हाणपूरवर हल्ला केला. मोठ्या फौजफाट्यासह मराठी सैन्य ७० मैलाची मजल मारून एकाएकी बुऱ्हाणपुरावर चालून गेले. तीन दिवसापर्यंत मराठे लुट करत होते. जडजवाहीर, सोने-नाणे, रत्ने आणि मौल्यवान सामान घेतले. इतर जिन्नसाकडे त्यांनी लक्षही दिले नाही. भांडीकुंडी, काचेचे सामान, धान्य, मसाले, वापरलेली वस्त्रे आदी सर्व लूट वाहून नेणे शक्य नसल्यामुळे तेथेच टाकून मराठ्यांचे सैन्य निघून गेले. संभाजी महाराजांच्या दराऱ्यामुळे पुढील काही महिने त्या वस्तूला हात लावायची कुणाची हिंमत झाली नाही, अशी आख्यायिका आहे. शहाबुद्दीन फिरोजजंगने रामशेज किल्ल्यावर चाल करून गेला. हा किल्ला सहज हस्तगत करता येईल, अशी मोघलांचा समज होता. मात्र, संभाजी महाराजांनी या किल्ल्यावर रसद पोहोचवण्यासाठी खास तुकडी तैनात केली. मराठ्यांनी कडवी झुंज देत हा किल्ला ५ वर्षे झुंजवत ठेवला होता. १६८९ च्या सुरवातीला छत्रपती संभाजी राजेंचा मेहुणा गणोजी शिर्के आणि औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान यांनी संगमेश्वरवर हल्ला केला. मराठ्यांत आणि शत्रूचे सैन्यात चकमक झाली. मराठ्यांचे संख्याबळ कमी होते. प्रयत्नांची शर्थ करूनही मराठे शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाहीत. परिणामी शत्रूने संभाजी महाराजांना जिवंत पकडण्यात मोघलांना यश आले. संभाजीराजे आणि कवी कलश यांना औरंगजेबापुढे बहादुरगड येथे नेले. संभाजीराजांनी धर्मांतर केल्यास जीवदान देण्याची अट औरंगजेबाने घातली होती. मात्र, संभाजी राजेंनी त्याला स्पष्टपणे नकार दिला. औरंगजेबाचे अनन्वित अत्याचार असह्य होऊन सुमारे ४० दिवसांनी फाल्गुन अमावास्या म्हणजेच ११ मार्च १६८९ रोजी संभाजी महाराजांची प्राणज्योत अखेर मालवली. असह्य यातना सहन करूनही संभाजीराजांनी स्वराज्यनिष्ठा आणि धर्मनिष्ठा सोडली नाही. म्हणून त्यांना अखंड भारतवर्षाने धर्मवीर हे पदवी बहाल केली.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे


११ मार्च
१) श्री.गोकुळ सुकलाल चौधरी
मु.पोयनाड, अलिबाग,
११-३-१९५२


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**कै. बाळकृष्ण भगवान पाटील, ५ वे पुण्यस्मरण, धाकटे शहापूर, अलिबाग**


# नवीन रिक्षा परवान्यांना स्थगिती

**● वाहतूक कोंडी, प्रदूषणाला आळा घालण्यासाठी उपाययोजना; परिवहन मंत्री सरनाईकांची माहिती**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
राज्यातील वाढती वाहतूक कोंडी रोखणे व शहरी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी ९ मार्चपासून नवीन ऑटो रिक्षांना परवाना देण्यास स्थगिती देण्यात येत असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नवीन ऑटो रिक्षांना कोणत्या निकषांवर नवीन परवाने द्यावेत, या संदर्भात पुढील निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.



मंत्री सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्रातील ५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार राज्य सरकारकडे असल्याचे भारत सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. त्या स्थानिक परीस्थिती नूसार महाराष्ट्र शासनाला याबाबत निर्णय घेण्याचा सल्ला दिला आहे. परिवहन मंत्री या नात्याने यांनी या संदर्भात केंद्र सरकारकडे केलेल्या पत्रव्यवहारानंतर केंद्राने कार्यालयीन स्मरणपत्राद्वारे ही माहिती दिली आहे. मोटार वाहन (दुरुस्ती) अधिनियम, २०१९ अंतर्गत राज्य सरकारांना वाहतूक व्यवस्थेचे नियमन करण्यासाठी आवश्यक लवचिकता देण्यात आली असल्याचेही यात नमूद करण्यात आले आहे.

मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम ६७ (३) नुसार राज्य सरकारांना प्रवासी व माल वाहतुकीसंदर्भातील परवाने बदलण्याचा तसेच विविध योजना राबविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या अधिकारांचा वापर करून राज्य सरकारांना लास्ट माईल कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी तसेच वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करता येणार असल्याचे केंद्राने स्पष्ट केले आहे. याबरोबरच सध्या अस्तित्वात असलेले ऑटो रिक्षा परवाने अनेक ठिकाणी एकाच घरात देण्यात आलेले आहेत, काही परवाने बांग्लादेशी नागरिकांना अवैध रितीने दिल्याच्या तक्रारी आमच्याकडे प्राप्त झाल्या आहेत. आतापर्यंत राज्यभरात सरसकट १४ लाखांपर्यंत ऑटो रिक्षा परवाने दिलेले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबतचा विषय स्थानिक परिस्थिती आणि वाहतुकीच्या गरजेनुसार राज्य शासनाने योग्य पद्धतीने हाताळावा, असा सल्ला केंद्र सरकारने दिला आहे.

> **राज्यातील नागरिकांना अधिक चांगली आणि सुलभ वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन लवकरच आवश्यक त्या धोरणात्मक निर्णयांवर विचार करणार आहे.**
> **– प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री**

## अंकुर प्रकल्पाच्या वतीने विज्ञान प्रदर्शन



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**
पेण तालुक्यातील आदिवासी व ग्रामीण भागातील प्राथमिक शाळांमधील मुलांसोबत अंकुर प्रकल्प गेल्या तीन वर्षांपासून काम करत आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा, त्यांचे संवाद कौशल्य वृद्धिंगत व्हावे, या उद्देशाने जागतिक महिला दिनाचे व विज्ञान दिनाचे औचित्य साधून आदिवासी व ग्रामीण भागातील मुलांसाठी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण आदिवासी भाषेतील प्रयोगाचे विश्लेषण करणारे विद्यार्थी हे आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले. मुलांमध्ये इंग्रजीचे संवाद कौशल्य सुलभ व्हावे, या उद्देशाने देशपांडे फॉउंडेशन व अंकुर प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने एसआयव्हीचा प्रकल्प इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविला जातो.

विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक राजिप शाळा प्रधानवाडी, द्वितीय क्रमांक राजिप शाळा कोलेटी आणि तृतीय क्रमांक राजिप शाळा बोरकस यांनी पटकावले.

स्पेल बी स्पर्धेमध्ये इयत्ता पाचवीमध्ये दक्ष पाटील यास प्रथम तर हर्षद पाटील यांस द्वितीय, इयत्ता सहावीमध्ये जिग्नेश संतोष भोईर यांस प्रथम तर निळ तांबोळी यास द्वितीय आणि इयत्ता सातवीमध्ये स्वराज खंडागळे प्रथम, तर रसिक घरत यांस द्वितीय क्रमांक प्राप्त झाले.

## निपुण मातांचा सत्कार

**। खांब । प्रतिनिधी ।**
रोहा तालुक्यातील रा.जि.प. शाळा वाशी येथे जागतिक महिला दिनानिमित्त निपुण मातांचा सत्काराचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग घेणाऱ्या मातांचा शाळेतर्फे विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान शाळेच्या शिक्षकांनी मातांनी शाळेसाठी दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांनी महिलादिनाचे महत्त्व सांगितले. तर विद्यार्थिनींनी सुंदर नृत्य सादर करून या कार्यक्रमाची शोभा वाढविली. या कार्यक्रमाला शाळेचे शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व सदस्य, अंगणवाडी ताई व मदतनीस, विद्यार्थी आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## महिला रिक्षाचालकाला बेदम मारहाण

**। पालघर । प्रतिनिधी ।**
पालघर जिल्ह्यातील विरारमध्ये एका महिला रिक्षाचालकास बेदम मारहाण करण्यात आली. विरार पूर्व रेल्वे स्थानक परिसरात रिक्षा उभी करण्याच्या किरकोळ वादातून हा प्रकार घडला. यामध्ये महिला चालक गंभीर जखमी झाली आहे. विशेष म्हणजे, ही घटना कर्तव्यावर असलेल्या वाहतूक पोलिसांसमोरच घडली. मिळालेली माहिती अशी की, सिद्धी सातारकर या विरारमध्ये रिक्षा चालवून आपला उदरनिर्वाह करतात. रात्री स्थानक परिसरात रिक्षा लावण्याच्या कारणावरून त्यांचा काही स्थानिक व्यक्तींशी वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि संबंधित व्यक्तींनी सिद्धी यांना बेदम मारहाण केली. या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या असून त्यांना उपचारासाठी संजीवनी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला असून, सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिसांच्या समोरच जर अशी घटना घडत असेल, तर सामान्यांचे काय? असा सवाल नागरिक विचारत आहेत. विरार पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

## गोखले महाविद्यालयात महिला दिन साजरा

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**
श्रीवर्धन येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त ‘शारीरिक व मानसिक आरोग्य हीच खरी संपत्ती’ या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी अपर्णा बंदरकर या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून महिलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करत निरोगी जीवनशैली, सकारात्मक विचारसरणी आणि तणावमुक्त जीवन याबाबत विद्यार्थिनींना सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य, प्रा. किशोर लहारे होते. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील महिला विकास मंचाच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमातून विद्यार्थिनींमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा तसेच महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थीनी व महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

## महिला दिनानिमित्त वॉकेथॉन; प्लास्टिक बंदीचा संदेश



**। रसायनी । प्रतिनिधी ।**
जागतिक महिला दिनानिमित्त बिर्ला कार्बन इंडिया प्रा. लि., पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट तसेच साहस फाउंडेशन रसायनी यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोपाडा परिसरात महिलांसाठी वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. ही वॉकेथॉन मोहोपाडा येथील अचानक मैदान येथून सुरू होऊन वृंदावन फ्लोरा सोसायटी, चांभार्ली येथे समाप्त झाली. या वॉकेथॉनमध्ये परिसरातील सुमारे १३० ते १४० महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. महिला दिनाचे औचित्य साधून महिलांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे तसेच समाजात एकात्मता वाढविणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

स्पर्धेतील विजेत्यांमध्ये प्रथम क्रमांक निलम जोशी, द्वितीय क्रमांक अनिता तांतरे, तृतीय क्रमांक इप्सिता सामल तसेच, ५० वर्षांवरील महिला गटामध्ये प्रथम क्रमांक निर्मला शेटिगर यांनी मिळवला.

यावेळी प्लास्टिक बंदी आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी सहभागी महिलांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. पर्यावरण रक्षणासाठी प्लास्टिकचा वापर टाळावा आणि कापडी पिशव्यांचा वापर करावा, असा संदेश उपस्थितांना देण्यात आला.

## महिलांसाठी मोफत आरोग्य शिबीर

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**
उज्वल भविष्य सामाजिक संस्था व माणुसकी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये महिलांची आरोग्य तपासणी करून त्यांच्या आरोग्याविषयी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन देण्यात आले.



कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. मंजिरी पाटील यांनी महिलांना स्वतःच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. दैनंदिन जीवनात स्वच्छता राखणे, संतुलित व पौष्टिक आहाराचे महत्त्व तसेच नियमित आरोग्य तपासणी का आवश्यक आहे, याबाबत त्यांनी उपस्थित महिलांना मोलाची माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे महिलांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली.

या आरोग्य शिबिरात अनेक महिलांची तपासणी करण्यात आली व त्यांना आवश्यक त्या आरोग्यविषयक सूचना देण्यात आल्या. तसेच उपस्थित महिलांना मोफत सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे महिलांमध्ये स्वच्छता व आरोग्याबाबत सकारात्मक संदेश पोहोचला.

हा उपक्रम उज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्वला भालचंद्र चंदनशिव, संस्थेचे सचिव व माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, तसेच संस्थेचे खजिनदार डॉ. नितीन गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला.

## चोरीचा मोबाईल सापडला

**। वाघ्रण । प्रतिनिधी ।**
अलिबाग तालुक्यातील पोयनाड पोलीस सुरेश प्रल्हाद वाघमारे यांनी मेहनत घेऊन चोरीला गेलेला मोबाईल शोधून मूळ मालकांना परत केला. ११ मार्च २०२५ रोजी सॅमसंग कंपनीचा मोबाइल प्रयास हॉस्पिटल येथून चोरीला गेला होता. ज्योती दिपक पाटील (रा. वाघ्रण) यांनी १२ मार्च २०२५ रोजी पोयनाड पोलीस ठाण्यात मोबाईल हरवल्याची तक्रार केली होती. तेव्हापासून तपास सुरू होता. अनेकदा वाघमारे यांना अपयश येऊन देखील त्यांनी तपास सुरूच ठेवला. त्यानंतर मार्च २०२६ मध्ये सदरचा मोबाइल रमाबाई मुंढे मु. हाजीमलंग वाडी ता. अंबरनाथ जि. ठाणे येथे असल्याचे समजले. त्यानुसार पत्राद्वारे व फोनवरून संपर्क करून सदरचा मोबाइल पोयनाड पोलीस ठाण्यात मुंढे यांनी जमा केला. शुक्रवारी (दि.६) त्यांनी हरवलेला मोबाईल मूळ मालकास परत केला. याबद्दल पोयनाड पोलिसांचे अभिनंदन करण्यात आले. तर मुंढे यांनी हा मोबाइल आदिवासी व्यक्तीकडून खरेदी केला असल्याचे सांगितले.



**ग. स. कातकर यांना आदरांजली | रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद**

# पुण्यतिथीनिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम

**। श्रीवर्धन । वृत्तसंस्था ।**
कुणबी समाजाचे ज्येष्ठ समाजनेते व थोर समाजसेवक ग.स. कातकर यांच्या २४ व्या पुण्यतिथीनिमित्त श्रीवर्धन येथे विविध सामाजिक आणि सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कुणबी समाजोन्नती संघ, श्रीवर्धन यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात भव्य रक्तदान शिबीर, रुग्णांसाठी फलवाटप आणि महिलांसाठी आरोग्य मार्गदर्शन शिबीर अशा उपक्रमांचा समावेश होता. समाजातील विविध स्तरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या कातकर यांना आदरांजली वाहिली.



ग.स. कातकर यांनी आपल्या आयुष्यभर समाजातील गरजू, शेतकरी आणि वंचित घटकांच्या मदतीसाठी कार्य केले. समाजाला एकत्र आणणे, शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि समाजातील दुर्बल घटकांना मदतीचा हात देणे हे त्यांचे जीवनकार्य होते. त्यांच्या या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कुणबी समाजोन्नती संघ दरवर्षी त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबवत असतो. पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ‘रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान’ या भावनेतून युवक-युवती, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान केले. शिबिरासाठी वैद्यकीय तज्ज्ञ आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचे विशेष पथक उपस्थित होते. संकलित झालेले रक्त गरजू रुग्णांच्या उपचारासाठी सरकारी रक्तपेढीकडे सुपूर्द करण्यात आले. रक्तदानानंतर प्रत्येक रक्तदात्याला संस्थेच्या वतीने प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह व आकर्षक बॅग देऊन गौरविण्यात आले.

### महिला दिनानिमित्त आरोग्य मार्गदर्शन

८ मार्च हा जागतिक महिला दिन असल्यामुळे महिलांसाठी विशेष आरोग्य मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिरात डॉ. ढवळे यांनी महिलांना विविध आरोग्यविषयक समस्या, त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय, संतुलित आहाराचे महत्त्व आणि निरोगी जीवनशैली याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच, पुण्यतिथीनिमित्त श्रीवर्धन येथील सरकारी उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले.

## निवडक

### महिलांच्या आरोग्य समस्यांवर मार्गदर्शन




**नेरळ :** कर्जत येथील इबसार ग्रुप ऑफ कॉलेजेस, दहिवली येथे जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. स्त्रिया या समाजाच्या खऱ्या शिल्पकार आहेत, हा संदेश देत जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आरोग्य तज्ज्ञ डॉ.अमृता पाटील यांचे महिलांच्या आरोग्य समस्यांवर मार्गदर्शन केले, तर आरोग्य तपासणी देखील करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून महिला दिन कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रमुख वक्त्या डॉ. अमृता पाटील यांनी विद्यार्थिनी आणि महिला कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना महिलांच्या विविध आरोग्य समस्यांवर सखोल मार्गदर्शन केले. ‘दैनंदिन जीवनात स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता, योग्य आहार आणि व्यायामाद्वारे आरोग्य कसे जपावे,’ यावर त्यांनी प्रकाश टाकला. तसेच उद्भवणाऱ्या शारीरिक समस्यांवर वेळीच काय उपाययोजना कराव्यात, याचेही त्यांनी प्रभावीपणे विश्लेषण केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मोहिनी भट्टाचार्य यांनी महिला सक्षमीकरणासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. याप्रसंगी इबसार कॉलेजचे वरिष्ठ प्राध्यापक आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नवी मुंबई पोलिसांचे संमेलन



**पनवेल :** जागतिक महिला दिनानिमित्त कळंबोली येथील पोलीस मुख्यालयात नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातर्फे महिला पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच मंत्रालयीन अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी विशेष संमेलन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सहआयुक्त संजय येनपुरे, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त (वाहतूक) तिरूपती काकडे तसेच सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) प्रेरणा कट्टे उपस्थित होते. यावेळी एकूण ११० महिला पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच मंत्रालयीन अधिकारी-कर्मचारी आणि ४२ पुरुष पोलीस अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी महिला कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कामकाजातील अडचणी व समस्यांबाबत माहिती घेतली आणि त्यावर आवश्यक मार्गदर्शन केले. तसेच नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील विविध पोलीस ठाणे व शाखांमध्ये उल्लेखनीय व प्रशंसनीय कामगिरी करणाऱ्या १३ महिला पोलीस अधिकारी व अंमलदारांचा त्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित महिलांसाठी प्रमुख अतिथी अशोक नंदिकुरळे (एन. अशोक) यांच्या ‘हसरी मैफिल’ या मनोरंजन कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते.

### महावितरण कार्यालयात महिला दिन साजरा

**कल्याण :** महावितरण कल्याण परीमंडळात आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. महावितरणच्या कल्याण येथील तेजश्री इमारतीत हा कार्यक्रम पार पडला असून या कार्यक्रमाला २०० महिला अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा होते. यावेळी प्रेरणादायी वक्ते ज्योत्स्ना साळवी यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. आज महिला सर्व क्षेत्रात आपले योगदान देत आहेत, ही कौतुकास्पद बाब असल्याचे त्यांनी सांगितले. व्यासपीठावर अनिल थोरात-अधिक्षक अभियंता, सुशील पावसकर-महाव्यवस्थापक मानव संसाधन, रामगोपाल अहिर-उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी उपस्थित होते.

### शिवभक्त प्रतिष्ठानतर्फे शिवजयंती साजरी



**खारेपाट :** अलिबाग तालुक्यातील शिवभक्त प्रतिष्ठान आयोजित भव्य शिवजयंती सोहळ्याला कुलाबा ढोल ताशा पथकाच्या गजरात व लेझीम पथकास श्री छत्रपती शिवाजी महाराजांची मानवमूर्ती भव्य मिरवणूक काढण्यात आली. या सोहळ्याला हजारो शिवभक्तांची उपस्थिती होती. यादिवशी महिलांकरिता ‘खेळ पैठणीचा होम मिनिस्टर’ हा भव्य कार्यक्रम संपन्न झाला. तसेच सायंकाळी आर्केस्ट्रा शिवगर्जना मावळ्यांची आगरी कोळी गीतांचा महाराष्ट्रात प्रसिद्ध गायक परमेश माळी यांनी हजारो रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. महत्वाचे म्हणजे शिवभक्त प्रतिष्ठान यांनी दहाव्या वर्षात प्रदार्पण केले. यावेळी मंडळाचे संस्थापक सुशील भोसले यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व शिवभक्तांचे सन्मान चिन्ह देऊन स्वागत केले. तसेच जनतेकरिता मोफत आरोग्य शिबीर ठेवण्यात आले होते. याचा अनेक ग्रामस्थांनी लाभ घेतला.

### नरेंद्र खांबेटे यांचे निधन



**म्हसळा :** म्हसळा तालुक्यातील केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष, ज्येष्ठ पत्रकार तथा साहित्यिक संजय केशव खांबेटे यांचे थोरले बंधू नरेंद्र केशव खांबेटे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ७३ वर्षे होते. नरेंद्र खांबेटे हे वाचनाची विशेष आवड असलेले उत्कृष्ट वाचक म्हणून परिचित होते. समाजकार्याबद्दल त्यांना विशेष जिव्हाळा होता. वडील केशवराव खांबेटे यांच्या प्रेरणेने आणि धाकटे बंधू संजय खांबेटे यांच्या माध्यमातून म्हसळा तालुक्यात सुरू असलेल्या सार्वजनिक वाचनालयाच्या कार्याबाबत ते सातत्याने संवाद साधत असत व सहकार्यही करीत असत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, सुना, नातवंडे, बहीण व भाऊ असा मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच म्हसळा परिसरातील सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार तसेच विविध सेवाभावी संस्थांच्या वतीने त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# दिवा-वीर मेमू रेल्वे सुरु करा

## वाहतूक कोंडीतून सुटकेची अपेक्षा । थांबा दिलेल्या गाड्यांना उत्तम प्रतिसाद




। माणगाव । प्रतिनिधी ।

जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या माणगाव शहरात दररोज हजारो नागरिक, पर्यटक आणि प्रवासी ये-जा करत असल्यामुळे शहरात सातत्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. या गंभीर समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून दिवा ते वीर मेमू रेल्वे सेवा सुरू करावी तसेच अधिकाधिक एक्स्प्रेस रेल्वे गाड्यांना माणगाव स्थानकात थांबे द्यावेत, अशी ठाम मागणी माणगाव रेल्वे प्रवासी संघटनेचे सचिव सुरेश जैन यांनी केली आहे.

माणगाव शहरातून जाणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गावर रोजच वाहतूक कोंडी होत असल्याने प्रवासी व स्थानिक नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. रखडलेल्या महामार्गाच्या कामांमुळे अनेक ठिकाणी अपघात होऊन निरपराध नागरिकांना जीव गमवावा लागत असल्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे प्रवासाचा ताण कमी करण्यासाठी रेल्वे सेवा अधिक सक्षम करण्याची गरज अधोरेखित होत आहे.

माणगाव हे रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने दररोज हजारो पर्यटक आणि प्रवासी येथे येत असतात. त्यामुळे माणगाव रेल्वे स्थानकावर सर्व प्रकारच्या रेल्वे गाड्यांना थांबे देण्यात यावेत, अशी मागणी सातत्याने केली जात आहे.

दोन वर्षांपूर्वी खा. सुनील तटकरे यांच्या प्रयत्नातून काही एक्स्प्रेस गाड्यांना थांबे मिळाले असले तरी अद्यापही अनेक महत्त्वाच्या गाड्या माणगाव स्थानकावर थांबत नसल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

### खासगी वाहनांचा आधार

माणगाव एसटी बस स्थानकातून दररोज शेकडो एसटी बस मुंबई व कोकणात धावत असल्या तरी दुपारच्या वेळेत रेल्वे उपलब्ध नसल्यामुळे अनेक प्रवाशांना खासगी बस किंवा वाहनांचा आधार घ्यावा लागतो. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक कोंडी वाढण्यासोबतच शासनालाही अपेक्षित महसूल मिळत नाही.

माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन आणि तळा या विधानसभा मतदारसंघातील प्रवाशांचा माणगाव स्थानकाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. सध्या थांबा असलेल्या रेल्वे गाड्यांना अक्षरशः हाऊसफुल्ल प्रतिसाद मिळत असून यामुळे रेल्वे प्रशासनालाही आर्थिकदृष्ट्या मोठा फायदा होत असल्याचे प्रवासी संघटनेने सांगितले आहे.

खा. तटकरे यांच्या माध्यमातून रोहा येथे मडगाव, संपर्क क्रांती, इंदोर, कोईम्बतूर आणि तिरुनेलवेली या एक्स्प्रेस गाड्यांना थांबे मिळाले आहेत. त्याच धर्तीवर माणगाव येथेही जनशताब्दी, मंगला, नेत्रावती, मत्स्यगंधा, कोकणकन्या आणि ऋषिकेश यांसारख्या महत्त्वाच्या एक्स्प्रेस गाड्यांना थांबे मिळाल्यास प्रवाशांना मोठा दिलासा मिळू शकतो.

याशिवाय दिवा ते रोहा या मार्गावर ज्या पद्धतीने रेल्वे सेवा सुरू आहे, त्याचप्रमाणे दिवा ते वीर मेमू रेल्वे सेवा दिवसातून तीन ते चार वेळा सुरू केल्यास माणगावसह रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते, असा दावा प्रवासी संघटनेने केला आहे.

दरम्यान, रोहा ते वीर या रेल्वे मार्गाचे दुपदरीकरण पूर्ण झाले असून वीर येथे रेल्वे गाड्या थांबविण्यासाठी आवश्यक ट्रॅक व सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे दिवा ते वीर मेमू सेवा सुरू करणे तांत्रिकदृष्ट्या शक्य असल्याचे प्रवासी संघटनेचे मत आहे.

या पार्श्वभूमीवर कोकणातील प्रवाशांची हेळसांड थांबवून मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक कोंडीतून दिलासा मिळावा यासाठी दिवा-वीर मेमू रेल्वे सेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी खा. तटकरे यांच्याकडे करण्यात आली आहे.

## निवडक



### ‘आगरातील ओजस्विनी’ पुरस्कार सोहळा

**अलिबाग :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अखिल भारतीय आगरी साहित्य संस्था, अलिबाग आयोजित आगरातील ओजस्विनी पुरस्कार वितरण हा महिला विशेष कार्यक्रम मुरुड तालुक्यातील मांडला येथील ग्रीन किंग रिसोर्टच्या सभागृहात उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी उमाजी केळुसकर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रकांत पाटील उपस्थित होते. यावेळी कैलास पिंगळे, चारुशीला म्हात्रे, संदेश पाटील, अमरनाथ भगत, अनिल पाटील, पद्माकर म्हात्रे, पां. शि. पाटील आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी विविध क्षेत्रांत वैशिष्ट्यपूर्ण कार्य करणाऱ्या तिघींना मआगरातील ओजस्विनीफ पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये सामाजिक क्षेत्रातील कामगिरीबद्दल रेखा मोकल, आध्यात्मिक कार्याबद्दल सुवर्णा भगत, ग्रामशिक्षण व आदिवासी विकास उपक्रम राबवल्याबद्दल मेघना पाटील यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. महिला जगत या विषयावर आधारित काव्यसंमेलनात नरेश पाटील, प्रणित थळे, अनंत भोईर, आर.आर. पाटील, बी.एन. पाटील, सदानंद ठाकूर, अश्विनी म्हात्रे, विशाखा भगत, चारुशीला म्हात्रे आणि पां.शि. पाटील अशा अनेक कवी-कवयित्रींनी आपल्या कविता सादर करून कार्यक्रमात रंग भरले. या सोहळ्यात प्रकाश भगत, योजिता पाटील, सुरेश पाटील, मनोज पाटील यांसह अनेक मान्यवरांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन शेवटी पां.शि. पाटील यांनी केले. या सोहळ्याला स्थानिक नागरिकांची आणि साहित्यप्रेमींची मोठी उपस्थिती लाभली होती.




### बेलकडे येथे महिलांना मार्गदर्शन

**अलिबाग :** आधार सामाजिक संस्था अलिबाग भाणि वीआरमोअर कंपनी सोल्यूशन प्रा.लि कंपनीच्या संयुक्त विद्यमाने बेलकडे गावात महिला दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने महिलांचे आरोग्य आणि आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीने महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मासिक पाळीत होणारे त्रास आणि गर्भाशयाचा कॅन्सर तसेच मधुमेह या आजारांवर महिलांना कंपनीच्या सिल्वहर डायरेक्टर माधुरी म्हात्रे आणि ब्रॉझ डायरेक्टर नेहा गुंड यांनी उत्तम मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला प्रशासक रुबिना भगत, ग्रामसेविका सोनाली पाटील, आधार सामाजिक संस्थेचे पदाधिकारी आणि माजी उपसरपंच प्रणिता पाटील आणि गावातील महिला, परिसरातील अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण व प्रेरणादायी होते. कार्यक्रम यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे सर्व सभासद, हितचिंतक तसेच महिला ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांनी सर्व सहकार्य करणाऱ्यांचे मन:पूर्वक आभार मानले.




### शहाबाज येथे महिला दिन साजरा

**अलिबाग :** शहाबाज येथे रविवारी (दि. ८) मार्च रोजी शुभांगी वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नागरिक भवन येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी वाघमारे यांनी ईशस्तवन सादर केले. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून कृषी आणि उपजीविका विभागाच्या कार्यक्रम अधिकारी मिनल पाटील उपस्थित होत्या. त्यांनी स्त्रीच समाजातील महत्व आणि महिलेची प्रमुख भूमिका काय यावर मार्गदर्शन केले. निर्मला पाटील यांनी दिव्यत्वाची जेथ प्रचिती ही कविता गाऊन उपस्थितांची मने जिंकली. तर नयना भगत यांनी जिजाबाई, ताराबाई, अहिल्याबाई, लक्ष्मीबाई, सावित्रीबाई, इंदिरा गांधी द्रौपदी मुर्मू आदीच्या कार्याची थोडक्यात ओळख करुन दिली. याप्रसंगी संतोष जुईकर, प्रकाश पाटील यांनी स्त्रीचे जीवन म्हणजे संघर्ष आणि जिद्द याचे दाखले दिले. शेवटी सामुहिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## रातवडमध्ये समुपदेशन संपन्न

। माणगाव । प्रतिनिधी ।

छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड येथे सखी सावित्री समिती व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी (दि.९) रोजी पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून अनिता सुनील मोरे यांनी उपस्थित माता-भगिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अजित शेडगे, शिल्पा पालकर, डॉ. शारदा निवाते यांनी विशेष परिश्रम घेतले. डॉ. नंदकिशोर जोशी, डॉ. निलेश रेवगडे, सुनील पाटील आदी मान्यवरांनी कौतुक केले.

## पी.एन.पी. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची
## खंडाळे गावास संशोधनपर भेट



। अलिबाग । प्रतिनिधी ।

प्रभाकर पाटील एज्यूकेशन सोसायटीचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील कला विभागांतर्फे तृतीय वर्ष भूगोल विद्यार्थ्यांसाठी संशोधन सर्वेक्षण आयोजन (दि.७) मार्च रोजी करण्यात आले होते.

खंडाळे गावातील लोकांचा सामाजिकवसांस्कृतिकदृष्टीकोनातून अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतः घरोघरी जाऊन प्रश्नावली व मुलाखत घेऊन माहिती संकलित केली. सदर संशोधन सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना सहा. प्रा नितीन करळे, सहा. प्रा संजना पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, कला विभाग प्रमुख डॉ. नम्रता पाटील, प्रा. मिलिंद घाडगे, या प्रसंगी खंडाळे गावचे ग्रामविकास अधिकारी, प्रथम नागरिक तसेच गावातील सर्वांचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाले.

## ज्येष्ठांकडून कर्तृत्वान महिलांचा सन्मान


रेवदंडा येथे जागतिक महिला दिन उत्साहात

। चौल । प्रतिनिधी ।

रेवदंडा ज्येष्ठ नागरिक संघाकडून जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करुन त्यांना आशीर्वाद देण्यात आले. रेवदंडा येथे ज्येष्ठ नागरिक संस्थेची मासिक सभा सरोज वरसोलकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. यावेळी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात ॲड. मनिषा लोहार, विमल भोईर, सीमा खेडेकर आणि सुहासिनी शेंड्ये या कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. तसेच चौल पंचायत समिती गणाच्या नवनिर्वाचित सदस्या अंकिता घरत यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना ॲड. मनिषा लोहार यांनी महिलांचे समाजातील योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. आज महिला शिक्षण, प्रशासन, कायदा, उद्योग तसेच सामाजिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पुढे येत असून, समाज परिवर्तनात त्यांचा मोलाचा वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच महिलांनी स्वतःच्या हक्कांविषयी जागरूक राहणे गरजेचे असून, अन्यायाविरोधात ठामपणे उभे राहण्याचे आवाहन त्यांनी केले. यासोबतच ज्येष्ठ नागरिक हे समाजाचे मार्गदर्शक असून, त्यांच्या अनुभवातून समाजाला दिशा मिळते, असेही त्यांनी सांगितले. ज्येष्ठ नागरिकांना कायदेशीर अडचणी किंवा कौटुंबिक समस्या आल्यास त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन व मदत करण्यासाठी आपण कायम तत्पर राहू, अशी ग्वाही ॲड. लोहार यांनी यावेळी दिली. समाजात महिला सन्मान, कुटुंबातील एकता आणि ज्येष्ठांचा आदर टिकवून ठेवणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुरेश खडपे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भगवान तांबडकर, मंगेश वडके, शरद वरसोलकर, रा.दि. राऊत, भालचंद्र नाईक, विलास घोसाळकर, लता चिटणीस, अलका देवधर आणि अपर्णा पाटील यांनी परिश्रम घेतले.

## कर्जतमध्ये एकात्मिक सेंद्रिय शेतीचे प्रशिक्षण



● (छायाचित्र : संजय गायकवाड)

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील अतिशय दुर्गम असलेल्या नांदगाव ग्रामपंचायत येथील आदिवासीबहुल गावातील एकूण २७ शेतकऱ्यांना युनायटेड वे मुंबई संस्थेद्वारा कार्यान्वयित आणि UPS फाऊंडेशन अर्थसहाय्यित इकोनॉमीक एमपॉवरमेंट ऑफ फारमर्स इन कर्जत प्रकल्प अंतर्गत दि. ७,८ मार्च रोजी दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण पुणे येथे आयोजित करण्यात आले.

सदर प्रशिक्षणात शेतीतील सेंद्रिय उत्पादनपासून ते थेट ग्राहक विक्रीपर्यंतचे प्रात्यक्षिक सहित मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी ज्ञानेश्वर बोडके यांनी शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचे महत्त्व, बाजारात मिळणारे महागडे रासयनिक उत्पादने आणि त्याचे दुष्परिणाम तसेच रासायनिक किडनाशकांना असलेले सेंद्रिय पर्याय निंबोळी अर्क, करंज तसेच इतर लोकल कडूपाला असलेल्या वनस्पतींचा उपयोग करून कशा प्रकारे कीड नियंत्रण करता येते त्याबाबत मार्गदर्शन केले. तर प्रमोद बोडके यांनी देसी गायचे महत्त्व, गोठा स्वच्छताचे महत्त्व, कमी जागेत आणि कमी पाण्यात हायड्रोपोनिक तंत्रज्ञानचा उपयोग करून उन्हाळ्यातही हिरवे लुसलुशीत चाऱ्याचे नियोजन कसे करावयाचे याचे प्रत्यक्षिक दाखविण्यात आले.

प्रिया बोडके यांनी ॲग्री प्रोडक्ट संबंधित हायजीनवर भर देत हातमोजे वापरणे, कृषी माल व्यवस्थित धुणे, इलेक्ट्रॉनिक काट्याच्या सहाय्याने व्यवस्थित आणि अचूक वजन करण्यावर भर दिला. सदर प्रशिक्षण यशस्वीपणे आयोजित करण्यासाठी युनायटेड वे मुंबई कार्यरत जल संजीवनी कर्जत प्रकल्पाचे फिल्ड ऑफिसर दीपक कवठे आणि प्रमोद धादवड यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मुरुड नगर परिषदेचा अर्थसंकल्प सादर

। आगरदांडा । प्रतिनिधी ।



मुरुड जंजिरा नगर परिषदेमार्फत आर्थिक वर्ष २०२६-२०२७करिता शिलकीचा व विकासाभिमुख असा अर्थसंकल्प विशेष सभेपुढे सादर करण्यात आला. नगर परिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी विशेष सभेत हा अर्थसंकल्प मांडला. शहराच्या सर्वांगीण विकासाचा विचार करून तयार करण्यात आलेला हा अर्थसंकल्प शिलकीचा आणि संतुलित असून पायाभूत सुविधा, स्वच्छता, पर्यटन विकास आणि नागरी सुविधा यावर विशेष भर देण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.

सदर अर्थसंकल्प तयार करताना मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या मार्गदर्शनाखाली लेखा विभागातील लेखापाल कपिल वेहेले व श्वेता विरकुड यांनी विशेष परिश्रम घेतले. अर्थसंकल्प तयार करताना नगर परिषद क्षेत्राच्या विकासाच्या गरजा, महसुली वाढीच्या शक्यता तसेच नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा दृष्टीकोन ठेवण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले.

या विशेष सभेस नगराध्यक्ष आराधना दांडेकर, उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत, तसेच सर्व नगरसेवक व नगर परिषदेचे अधिकारी उपस्थित होते.

## गरिबाच्या फ्रीजला मागणी



● पनवेलमध्ये वाढत्या मार्च हिटमुळे पारंपरिक मातीच्या लाल माठांना जोरदार मागणी वाढली आहे. त्यामुळे माठ विक्रेत्यांच्या व्यवसायालाही चांगली चालना मिळत आहे. (छायाचित्रः राजेश डांगळे)

## चाकरमानी लागले परतीच्या प्रवासाला

। तळा । प्रतिनिधी ।

शिमगा व होळी सणासाठी आलेले मुंबईतील चाकरमानी आता परतीच्या प्रवासाला लागले आहेत. त्यामुळे सकाळपासून तळा बसस्थानकात प्रवाशांची गर्दी पाहायला मिळाली. ग्रामदेवतेचा पालखी सोहळा, काटखेळ, शंकासुराची सलामी, शिमग्यातील आशा अनेक कार्यक्रमांचा आस्वाद घेतल्यानंतर चाकरमानी पुन्हा आपल्या कामावर परतण्यासाठी परतीच्या प्रवासाला लागल्यामुळे तळा बसस्थानकात जागा आरक्षित केलेले प्रवासी निवांत तर ज्यांची जागा आरक्षित नव्हती असे प्रवासी बसमध्ये जागा पकडण्यासाठी धडपड करताना पाहायला मिळाले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, किचन हेल्पर लेडीज, कॉन्टिनेंटल कुक, ब्रेकफास्ट कुक,मेन्टेनन्स पर्सन, वेटर,हाऊसकीपर, हाऊसकिपिंग सुपरवायझर,रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल), इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- **अलिबाग-कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट** विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- **सुवर्णसंधी** ( WORK FROM HOME) : वाढत्या महागाईमध्ये एक्स्ट्रा इन्कम कसे घेऊ शकतो? घरबसल्या कामाची सुवर्णसंधी नोकरदार गृहिणी विद्यार्थि इतर सर्वांसाठी घरातून मोबाईल वरून किंवा ऑफिसमधून काम करा. Monthly Income १२००० १५०००, Age १८+, Contact Numbe - ९१५८६००३४४.
- **ओम साई टेक्निशियन** इलेक्ट्रिक, वेल्डर, फ्रिज व एसी टेक्निशियन पाहिजे. संपर्क : ७०६६१३८३६८
- **घरकामासाठी** बाई पाहिजे. ७३७८४८०१५१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## ‘खा खेळा’ अभियानांतर्गत चित्रकला स्पर्धा

**नवीन पनवेल :** सांस्कृतिक युवा प्रतिष्ठान सीवूड्स येथे अपर्णा राजेश शहा संस्थापित खा खेळा वाचा अभियानांतर्गत मुलांमध्ये चित्रकला स्पर्धा भरवण्यात आली. ज्यामध्ये अनेक मुलांनी स्वयंप्रेरणेने आणि उत्साहाने या स्पर्धेमध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेतला. वाहतूक पोलीस देखील या स्पर्धेत उपस्थित होते. यावेळी पोलिसांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या स्पर्धेचा हेतू मुलांमध्ये उत्साह, एकाग्रता, कल्पना, आणि स्पर्धात्मक परी-क्षेची तयारी, साधून सवयींना चांगल्या सवयीमध्ये परिवर्तित करण्यात हेतू होता.

## कायदा सुव्यवस्था बाबत अधिकाऱ्यांना केल्या सूचना | रसायनी पोलीस ठाण्यास भेट

# दराडेंनी घेतला वार्षिक कामकाजाचा आढावा



। वावोशी । प्रतिनिधी ।

कोकण परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी रसायनी पोलीस ठाण्याला सदिच्छा भेट देत वार्षिक निरीक्षण केले. या भेटीदरम्यान त्यांनी पोलीस ठाण्याच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेत विविध विभागांची पाहणी केली.

या प्रसंगी रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक डॉ. आँचल दलाल, जिल्हा पोलीस उपअधीक्षक अभिजित शिवथरे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल उपस्थित होते.

या निरीक्षण प्रक्रियेदरम्यान खालापूरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, रसायनीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ, खोपोलीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन हिरे, चौक पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल पवार आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव यांच्यासह इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी पोलीस ठाण्यातील नोंदी, शस्त्रागार तसेच परिसराची पाहणी केली. कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना व मार्गदर्शन केले.

वार्षिक निरीक्षणाच्या निमित्ताने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रसायनी पोलीस दलाच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. दरम्यान, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेच्या वतीने विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे तसेच रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. आँचल दलाल यांची भेट घेण्यात आली. तसेच जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने रसायनी पोलीस ठाण्यातील महिला पोलीस कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

# मध्यपूर्व निर्यातीसाठी जेएनपीएकडून दिलासा

**उरण :** मध्य पूर्वेतील राजकीय अस्थिरतेमुळे निर्यातदारांना भेडसावणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन जेएनपीएने बंदर वापरकर्त्यांना मोठा दिलासा दिला आहे. बंदरात अडकून पडलेल्या निर्यात कंटेनर्सवरील ग्राउंड रेंट, ड्वेल टाइम आणि रीफर प्लग-इन शुल्कात सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे.

बंदरे, जहाजवाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाच्या निर्देशानुसार २८ फेब्रुवारी २०२६ पासून टर्मिनलमध्ये असलेल्या किंवा ८ मार्च सकाळी ७ वाजेपर्यंत गेट-इन झालेल्या कंटेनर्ससाठी १५ दिवसांपर्यंत ग्राऊंड रेंट शुल्क पूर्णपणे माफ करण्यात आले आहे. तसेच नाशवंत वस्तू असलेल्या रीफर कंटेनर्ससाठी रीफर प्लग-इन शुल्कात ८० टक्के सवलत देण्यात आली आहे. जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाल यांनी सांगितले की, निर्यातदारांना सहकार्य करणे आणि व्यापार सुरळीत ठेवणे हे बंदराचे प्राधान्य आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांच्या सुचनेवरून मी मौजे परहूरपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींच्या विद्यमान मालकांचे, त्या मिळकतींचे मालकी हक्कांचे निर्वेधतेची पडताळणी करीत आहे. मिळकतींचे मालकांनी असे निवेदीत केले आहे की, सदर मिळकतींमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत.

तरी ज्या इसमांचा सदर मिळकतींमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, कुळवहिवाट, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट अे.डी.द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतींमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायमस्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व विद्यमान मालकांचे सदर मिळकतींचे मालकी हक्क निर्वेध आहेत असे गृहित धरुन आमचे अशिल नियोजीत खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**
**मिळकतींचे वर्णन**
**मौजे परहूरपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड**

| गट नं./हि.नं | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) | विद्यमान मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| २९४ | ०-२७-८०<br>पो.ख. ०-०१-३०<br>०-२९-१० | ७.५६ | श्रीधर दत्तात्रेय ठाकूर<br>धनश्री दिनेश जळवी<br>केतकी सुहास पाटील<br>मधुकर लक्ष्मण ठाकूर<br>पांडूरंग लक्ष्मण ठाकूर<br>प्रभाकर लक्ष्मण ठाकूर<br>भाग्यश्री विक्रांत ठाकूर<br>सरोजिनी लक्ष्मण पाटील<br>विपुल वामन भोपी<br>अर्चना अरुण सुतार<br>अलका विद्याधर ठाकूर<br>अमित विद्याधर ठाकूर<br>स्नेहल निलेश म्हात्रे |
| २९५ | ०-३२-४०<br>पो.ख.०-०३-३०<br>०-३५-७० | ८.८१ | श्रीधर दत्तात्रेय ठाकूर<br>धनश्री दिनेश जळवी<br>केतकी सुहास पाटील<br>अमित विद्याधर ठाकूर<br>अलका विद्याधर ठाकूर<br>स्नेहल निलेश म्हात्रे |

अलिबाग
तारीख : ११/३/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांच्या निर्देशांनुसार, खालील परिशिष्टात सविस्तरपणे नमूद केलेल्या शेतजमिनीसंदर्भात आम्ही सदरहू शेतजमिनींच्या मालकांच्या नामाधिकारांची तपासणी करीत आहोत सदरहू मालकांची नावे खालील परिशिष्टामध्ये त्यांनी धारण केलेल्या जमिनीच्या वर्णनाशेजारी नमूद केलेली आहेत.

सदरहू शेतजमिनींमध्ये किंवा त्यांच्या कोणत्याही भागामध्ये कोणाही व्यक्तीचा हक्क, नामाधिकार हिस्सा, हितसंबंध, अधिकार वा दावा-जसे की विक्री, हस्तांतर, अभिहस्तांतरण, गहाण, ताबा, धारणाधिकार, भाडेपट्टा, विश्वव्यवस्था, भेट हक्क, वारसा, देखभाल, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, वहिवाटीचा हक्क, कोणत्याही न्यायालयाचा आदेश किंवा हूकूम किंवा कोणत्याही प्रकारचा करारनामा वा अन्य कोणत्याही प्रकारे, असल्यास निम्नस्वाक्षरीकरांना त्यांच्या खालील नमूद पत्त्यावर दाव्यांच्या पृष्टर्थ्य दस्तऐवजी पुराव्यांसह सदरहू जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४(चौदा) दिवसांच्या मुदतीमध्ये कळविणे आवश्यक आहे. अन्यथा सदरहू शेतजमिनींमध्ये खालील परिशिष्टमध्ये नमूद केलेल्या व्यक्तिंव्यतिरिक्त अन्य कोणाही व्यक्तींचा कोणत्याही प्रकारचा हक्क, नामाधिकार, हितसंबंध अथवा दावा नाही किंवा त्यांचा त्याग केल्याचे/सोडून दिल्याचे समजण्यात येईल.

**जमिनीचे परिशिष्ट**
गावः आमणोरी, तालुकाः सुधागड, जिल्हाः रायगड येथे स्थित असलेली शेतजमीन जिचे सर्व्हे क्र. क्षेत्रफळ, आकार, वर्ग व मालकी अधिकार खाली नमूद केल्याप्रमाणे आहेत.

| सर्व्हे नं. | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार रूपये | वर्ग | जमीनमालक |
|---|---|---|---|---|
| ३४/२ | ०-२३-९० | २.२२ | १ | दत्ता गेणू साळुंखे |
| ३४/३ | ०.१२.५० | २.०० | १ | दत्ता गेणू साळुंखे |

दिनांक : ११ मार्च २०२६

सही/-
**कदम आणि कंपनी**
वकील
३०५-३०६, ३रा माळा, युसूफ बिल्डींग,
महात्मा गांधी रोड, फोर्ट,
मुंबई ४०० ००१.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागि[illegible]-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल **श्री. इमरान इरफान शेख** यांनी खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत त्याचे मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे साळोख तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. तौसिफ मुस्तफा पौंजेकर | ५४ | ४ | ०-४९-०० | ०-६८ |

सदरील जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून २१ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास त्यांनी सोडुन दिलेला आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : नेरळ
दि. १०/०३/२०२६

खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट
सही/-
**ॲड. साकीब अशरफ पानसरे**
ऑफीस शॉप नं.३८, पहिला मजला, बी-विंग,
तुलसी सेंटर पॉईंट, रेल्वे स्टेशन जवळ, खांडा, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१
मो. ८०८७७७०५२५/९०११५००२३५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल **श्री. अंशुल गुप्ता** यांनी खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत त्याचे मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे तळवाडे, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. इमरान इरफान शेख | १५ | ३२ | ०-१८-०० | ०-१९ |

सदरील जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास त्यांनी सोडुन दिलेला आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : नेरळ
दि. १०/०३/२०२६

खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट
सही/-
**ॲड. साकीब अशरफ पानसरे**
ऑफीस शॉप नं.३८, पहिला मजला, बी-विंग,
तुलसी सेंटर पॉईंट, रेल्वे स्टेशन जवळ, खांडा, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१
मो. ८०८७७७०५२५/९०११५००२३५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, खालील नमूद केलेली जमिन मिळकत १. श्री. प्रशांत भगवान दशपुते, २.सौ. मिनाक्षी भगवान दशपुते यांच्याकडुन आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कुणे, ता. अलिबाग, जि. रायगड | ३८८ | ०-६३-२०<br>पो.ख.०-०३-५०<br>एकूण ०-६६-७०<br>पैकी ०-४८-००<br>पो.ख. ०-०३-५०<br>एकूण ०-५१-५० | १.६४ |

सदर जमिन मिळकतीपैकी १. श्री. प्रशांत भगवान दशपुते, २. सौ. मिनाक्षी भगवान दशपुते यांच्या मालकीचे एकूण ०-५१-५० हे.आर इतके क्षेत्र असलेली जमिन मिळकत ही या नोटीसीचा विषय आहे.

तरी वर नमूद जमिन मिळकतीबाबत कुणाचेही ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील जमिन मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, असे समजुन इतर कोणाचाही कायदेशीर हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक आमच्या अशिलांच्या हक्कात सोडून दिलेले आहे, असे समजून व कायदेशीर बाबींची पूर्तता करून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ११/०३/२०२६

**ॲड. गीता सं. पवार**
०५, श्रुती सारंग सहकारी सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हण आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाची जमीन मिळकती पैकी क्षेत्र ०-०५-०० हे.आर सौ.शैलजा शेखर तोडणकर रा. धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीचे असून, सदर जमिन मिळकत माझे अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले असून, तशा आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| गोंधळपाडा, ता. अलिबाग जि. रायगड | ४९/१/२/क | ०-४९-५०<br>पो.ख. ०-०५-५०<br>एकूण ०-५५-०० | ७.८३ |

सदर वर नमूद जमिन मिळकतीपैकी सौ. शैलजा शेखर तोडणकर यांचे मालकीचे क्षेत्र ०-०५-०० हे. आर आकार ०.७९ रु.पैसे मिळकत नोटीसीचा विषय आहे.

सदर जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध व अन्य कोणताही बोजा, साठेकरार, ताबा, कब्जा, कुळव्यवहार, चार्ज, पोटगी हक्क, बक्षिस भाडेपट्टा, फरोक्तखत, जाण्या-येण्याचे मार्ग, लिज, दावा वगैरे अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १०/०३/२०२६

सही-
**(ॲड. वैभव वसंत पाटील)**
रा. नवेदर बेली, ता.अलिबाग जि. रायगड,
मो.९८५०२६१००८
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल श्रीम.रंजना दिनेश वळवी यांनी श्री. किसन गणपत पादीर यांचेकडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे ओलमण ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| १२ | ३ | ०.२४.०० | २.३१ |

तंदगभूतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा-कबजा कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - ११-०३-२०२६

**ॲड. दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस,एल.एल.बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो.नं- ९५६१७१ ९४९४
९०११७१६००१

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे खंदार, ता.रोहा, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) अनीस मुश्ताक वरवंडे, २) जाहीदा मुश्ताक वरवंडे, ३) मुश्ताक महमुद वरवंडे, ४) सुहाना अनीस वरवंडे यांचेकडून श्री.प्रसाद हिराचंद पिंगळे यांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे खंदार, ता. रोहा, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| खंदार ता.रोहा | १२४ | क्षेत्र ९-७४-००<br>पो.ख. ३-२५-००<br>एकुण क्षेत्र १२-१९-०० | ७.५० |

दिनांक : ०९/०३/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट जे.एस.एम कॉलेजजवळ,
अलिबाग-रायगड मोबा.९७६७०१०९०२

## पोलादपूर नगरपंचायत पोलादपूर
## जाहीर निविदा सुचना

१. पोलादपूर नगरपंचायत हद्दीत नावस्यकतेनुसार भिती चित्र रंगवणे व IEC साहित्य मागविणे.

या कामासाठी नोंदणीकृत ठेकेदाराकडून द्विलीफाफा पद्धतीने (ऑफलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. निविदेसाठी आवश्यक कागदपत्रे नगरपंचायत पोलादपूर कार्यालयात उपलब्ध होतील.

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत पोलादपुर**

## MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | *Esti. Cost* |
|---|---|---|
| **Tend 27 / 25-26 RFX 7000039147** | Supply and installation of all in one PC at various locations under EHV (O&M) Circle, Panvel. | **Rs. 16,72,502.71** |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee : Rs. 500/- + GST Submission of bids from 06.03.2026 to 20.03.2026 up to 11:00 hrs, Opening date:- 20.03.2026 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer(Adm) Mob. No. 8412050202
E-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

## पनवेल महानगरपालिका, पनवेल
## ई-निविदा सुचना
## विद्युत विभाग

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब-१ नमुन्यातील खालील नमूद कामांची निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील विद्युत विभागाकडील नोंदनीकृत ठेकेदाराकडुन मागविण्यात येत आहे.

| अ क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय (GST सोडुन) | निविदा अनामत रक्कम (रु) | कोरी ई निविदा किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १. | पमपा/ विद्युत/ १७/ २०२५ | पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'क' व 'ड' क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी दोन वर्षाकरीता विद्युत उपकरणे व विद्युत व्यवस्था भाडेतत्वावर उपलब्ध करुन देणे. | रु. २,४५,२१,८५८/- | रु. १,५०,०००/- | रु. २,३६०/- |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पनेवल महानगरपालिका संकेत स्थळ https://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधित निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

जा.क्र./पमपा/विद्युत/२०२५/प्र.क्र.०८/१९५/२०२६

दिनांक- १०/०३/२०२६

sd/-
**अतिरिक्त आयुक्त (I)**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आमचे अशिल हे गाव पाचगणी, तालुका पेण, जिल्हा रायगड येथील गट क्र.३७/१ (जुना सर्व्हे क्र.३५९) धारक मोजमापित ११.८२ हेक्टर क्षेत्रफळाच्या शेतजमिनीची खरेदी करू इच्छित आहेत. सदर जागा ही सध्या श्री. वृषभ देवेंद्र जैन, श्री. सुभाष विमलचंद जैन (एचयूएफ), कु. सुनंदा लीलाधर डाके, श्री. अशोक गंगाराम पाटील, कु. अर्चना विशाल पवार व श्री. अभिजीत मोहन पाटील यांच्याद्वारे धारण केलेली आहे. कोणाही व्यक्तीचा सदर मालमत्तेमध्ये कोणताही दावा, हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या हरकती कागदपत्रांसमवेत सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या आत सादर कराव्यात अन्यथा खरेदीची प्रक्रिया करण्यात येईल.

**ॲडव्होकेट ऑल्विन दवे**
पत्ता : १/९२, उन्नत नगर २, महात्मा गांधी मार्ग, पानवलकर रुग्णालयाजवळ, गोरेगाव (प.), मुंबई, महाराष्ट्र - ४०० ०६२.
संपर्क क्रमांक : + ९१ ८६५७४ ५८१६७.

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to public at large that I am investigating the title of :-

Mr. Vivek Pandurang Bhoir, Mr. Vinayak Harischandra Bhoir, Mr. Ganesh Krushna Bhoir, Mr. Ravindra Gajanan Bhoir and others, having residence at Village Zirad, Taluka Alibag. District Raigad the property more particularly described in the First Schedule hereunder written ("Property"), free from all encumbrances and claims.

All person(s), claiming or having any share, right, title, estate, interest, claim or demand whatsoever to or in respect to the Property or any part thereof, whether by way of sale, ownership, transfer, assignment, tenancy, sub-tenancy, lease, sub-lease, license, gift, release, exchange, family arrangement, possession, mortgage, charge, encumbrance, lien, inheritance, succession, bequest, easement, order/decree/judgment of court, attachment, writing or otherwise of any nature whatsoever are hereby required to make the same known in writing to the undersigned at the within mentioned address, within fourteen (14) days from the date of publication here of, with notarized documentary evidence on which they are basing and asserting their rights with respect to the Property or any part thereof, failing which, such claim demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/or abandoned to all intents and purposes.

**THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO:**
**(Description of the said Property)**

All that piece and parcel of the land being, lying and situate at Village Zirad, Taluka Alibag, District Raigad and having description as follows :

| Sr. No. | Bhumapan Kramank/ Upavibhag | Area (Akak H,R, Sq.Mtrs. | Assessment Value (Rs.Ps.) |
|---|---|---|---|
| 1. | 94 | 1.33.00 | 1.90 |
| 2. | 97/1 | 1.38.80 | 5.90 |
| 3. | 100 | 0.04.00 | 0.05 |
| 4. | 101 | 0.30.40 | 4.50 |
| 5. | 107 | 0.66.40 | 6.35 |
| 6. | 112 | 0.58.00 | 1.05 |
| 7. | 99 | 0.75.40 | 8.65 |
| 8. | 95 | 0.71.30 | 7.55 |
| 9. | 98 | 0.04.50 | 0.45 |

**Adv. S. Y. Bartake**
**Adv. S. S. Bartake**
Office At B/202, Kuberakshe C.H.S., Near Maruti Naka, Alibag. Taluka Alibag. District Raigad, 402 201.

## जाहीर नोटीस

माझे आशिल यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे:-

**मौजे झिराड, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाचे मिळकती.**

| मौजे | भुमापन क्र./ उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| झिराड | ९४ | १.३३.०० | १.९० |
| झिराड | ९७/१ | १.३८.८० | ५.९० |
| झिराड | १०० | ०.०४.०० | ०.०५ |
| झिराड | १०१ | ०.३०.४० | ४.५० |
| झिराड | १०७ | ०.६६.४० | ६.३५ |
| झिराड | ११२ | ०.५८.०० | १.०५ |
| झिराड | ९९ | ०.७५.४० | ८.६५ |
| झिराड | ९५ | ०.७१.३० | ७.५५ |
| झिराड | ९८ | ०.०४.५० | ०.४५ |

सदरहू मिळकती, त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, कुंपण, वगैरेसह अशा मिळकतीबाबत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक ०१) श्री. विवेक पांडुरंग भोईर, ०२) श्री. विनायक हरिश्चंद्र पाटील ०३) श्री. गणेश कृष्णा भोईर, ०४) श्री.रविंद्र गजानन भोईर, वगैरे सर्व मु.झिराड, ता.अलिबाग, जि. रायगड यांनी संदर्भित मिळकत त्यांचे मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची व निर्वेध असल्याचा भरवसा माझे आशिल यांस दिला आहे. माझे आशिल यांनी श्री.विवेक पांडुरंग भोईर, वगैरे यांचे सदरहू मिळकती वरील मालकी हक्काची तपासणी करण्याच्या सुचना दिल्या आहेत. सबब, याउपरही सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, साठेकरार, दान, फरोक्त, कब्जा, वहीवाटीचे हक्क, लिन, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख १०.०३.२०२६

**(ॲड. एस. वाय. बारटके)**
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे कि, आमचे अशिलांसोबत खालील वर्णनाच्या शेतजमीन मिळकती संदर्भात व्यवहराची बोलणी सुरु आहे, त्या संदर्भात आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे बहिरोळे, ता. अलिबाग, जिल्हा रायगड**

| गट नं. | क्षेत्र (हे.आर. चौ.मी) | आकार रु. पै. | भोगवटादाराचे नाव |
|---|---|---|---|
| १८ | ०-१०-१० | ०-१८ | रजत कुमार मधोक |
| १९ | ०-०७-१० | ०-१२ | |
| २० | ०-०५-०० | ०-०८ | |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकती व या मिळकतीमध्ये असलेले मापगाव ग्रामपंचायत घर क्र. २२ व १६८, या निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालक यांनी दिला असून गावचे गाव नमुना न. सातबारापत्रकी ही त्यांचे नाव मालक म्हणुन दाखल आहे. तरीही सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत यदाकदाचित वरील मिळकतीबाबत कुणाचाही विक्री, दान, गहाण, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारस हक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट अगर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्याबद्दलची लेखीहरकत, सबंधीतांनी खाली सही करणार यांचेकडे योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासाहित द्यावी. विहित मुदतीत लेखी हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध आहे असे गृहीत धरून सदरील व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत आमचे अशील यांचेवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्व लोकांनी नोंद घ्यावी.

दिनांक :- १०/०३/२०२६

सही/-
**ॲड. मसीर अ.घोले**
१७, अलिबाग कमर्शियल कॉम्प्लेक्स,
चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, खालील नमूद केलेली जमिन मिळकत श्री. रमेश नारायण कानप यांच्याकडुन आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कुणे, ता. अलिबाग. जि. रायगड | ३८८ | ०-६३-२०<br>पो.ख. ०-०३-५०<br>एकूण ०-६६-७०<br>पैकी ०-१५-२० | ०-४८ |

सदर जमिन मिळकतीपैकी श्री. रमेश नारायण कानप यांच्या मालकीचे ०-१५-२० हे.आर इतके क्षेत्र असलेली जमिन मिळकत ही या नोटीसीचा विषय आहे.

तरी वर नमूद जमिन मिळकतीबाबत कुणाचेही ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील जमिन मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, असे समजुन इतर कोणाचाही कायदेशीर हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक आमच्या अशिलांच्या हक्कात सोडून दिलेले आहे, असे समजून व कायदेशीर बाबींची पूर्तता करून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक :११/०३/२०२६

**ॲड. गीता सं. पवार**
०५, श्रुती सारंग सहकारी सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हण आळी,
ता.अलिबाग, जि.रायगड

# निवडक

## महाडमध्ये हाफ मॅरेथॉन संपन्न



**महाड :** आरोग्य, एकता आणि स्थानिक सहभागाला नवी दिशा मिळावी याकरिता आदित्य बिर्ला ग्रुपच्या ग्रासिम इंडस्ट्रीजचा भाग असलेल्या बिर्ला ओपस पेंट्सने नुकतीच महाड हाफ मॅरेथॉनचे दुसरे पर्व यशस्वीरीत्या पूर्ण केला. महाराष्ट्रातील समाजाभिमुख उपक्रम आणि सर्वांगीण विकासासाठीच्या त्यांच्या बांधिलकीतील हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला. मॅरेथॉन सकाळी काकड तळे ग्राउंड, बाजारपेठ, काकरतळे, महाड येथून सुरू झाली. हिरवाईने नटलेल्या महाडच्या निसर्गरम्य पार्श्वभूमीवर २१.१ किमीचा मार्ग धावपटूंना सहनशक्ती, उत्साह आणि सामुदायिक भावनेचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. या स्पर्धेत हजारो धावपटू, कुटुंबे आणि फिटनेसप्रेमी सहभागी झाले. बिर्ला ओपस पेंट्सच्या प्रमुख सामुदायिक उपक्रमांपैकी एक असलेली ही मॅरेथॉन केवळ क्रीडा स्पर्धा नसून औद्योगिक प्रगतीसोबत स्थानिक कल्याणही साध्य व्हावे, या कंपनीच्या तत्त्वज्ञानाचे प्रतीक आहे. महाडमधील अत्याधुनिक उत्पादन केंद्राजवळ आयोजित झालेल्या या धावण्याने कंपनी आणि स्थानिक समाजातील दृढ नात्याला अधोरेखित केले. या कार्यक्रमाला बिर्ला ओपस पेंट्सचे सीओओ अजित कुमार यांच्यासह महाडचे महापौर सुनील कविस्कर, उपमहापौर संदीप जाधव, तसेच पोलीस निरीक्षक संदीप भोसले उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीने या उपक्रमाला स्थानिक प्रशासनाचे बळकटीकरण मिळाले.

## रोहा खो-खो प्रीमियर लीग संपन्न



**खांब :** रोहा तालुक्यातील क्रीडाप्रेमींसाठी आयोजित करण्यात आलेली रोहा खोखो प्रीमियर लीग २०२६ स्पर्धा मेढा येथील मैदानावर उत्साहपूर्ण वातावरणात व यशस्वीरित्या पार पडली. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत रोहा तालुक्यातील नामांकित संघांनी सहभाग घेत उत्कृष्ट दर्जाचे सामने खेळले. प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या स्पर्धेत अवचितगड मेढा रोहा फायटर्स संघाने दमदार खेळ करत अंतिम सामन्यात विजय मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तर एस.एन.एस. स्पोर्ट्स रोहा चॅलेंजर्स संघाने उत्कृष्ट खेळ करत द्वितीय क्रमांक मिळवला. तर श्री भैरवनाथ यशवंतखार रोहा वॉरियर्स संघाने तृतीय क्रमांक मिळवला आणि ओम साई राम रोहा लिजेंड्स संघाने चतुर्थ क्रमांक प्राप्त केला. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंनाही वैयक्तिक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये उत्कृष्ट रक्षण प्रतीक जंगम (अवचितगड मेढा), उत्कृष्ट आक्रमक राज देशमुख (एस.एन.एस. स्पोर्ट्स), उद्योन्मुख खेळाडू रुद्र मांडलेकर (श्री भैरवनाथ यशवंतखार), उत्कृष्ट कर्णधार ओंकार मालुसकर (ओम साई राम), सामनावीर अक्षय मोरे (अवचितगड मेढा) यांना सन्मानित करण्यात आले.याशिवाय महिला खोखो सामन्यात सह्याद्री शक्ती संघाने प्रथम क्रमांक मिळवला तर कोकण पॉवर संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. स्पर्धेचे आयोजन जय बजरंग क्रीडा मंडळ, रोहा यांच्या वतीने करण्यात आले होते.

## ॐ म्हसोबा दिघेवाडी चषकाचा मानकरी श्री राजे इलेव्हन दिघेवाडी

**पाली/गोमाशी :** श्री म्हसोबा ११ दिघेवाडी ग्रामस्थच्या वतीने मर्यादित ओव्हर अर्म क्रिकेट सामने शनिवारी (दि.७) व रविवारी (दि.८) दिघेवाडी येथे आयोजित करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी नामवंत २४ संघाने आपला प्रवेश निश्चित केला होता. या स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सुरेश खैरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या स्पर्धेचे भव्यदिव्य असे नियोजन करण्यात आले होते.या स्पर्धेसाठी प्रेक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धेचे युट्युबच्या माध्यमातून थेट प्रक्षेपण करण्यात आले होते. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचा मानकरी श्री राजे इलेव्हन दिघेवाडी हा ठरला या संघास रोख रक्कम ५५,५५५ रु व आकर्षक चषक, द्वितीय क्रमांक शिव शंभू इलेव्हन आंबोलेवाडी या संघास रोख रक्कम ३३३३३ रु व आकर्षक चषक तृतीय क्रमांक एमआरएच फणसवाडी या संघास रोख रक्कम १५ हजार रु व आकर्षक चषक, चतुर्थ क्रमांक कोशिबळे इलेव्हन या संघास रोख रक्कम ११ हजार व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेतील सामनावीर नैनेश पवार (सायकल), उत्कृष्ट फलंदाज हुसेन टाकी, उत्कृष्ट गोलंदाज रवी बुंबक, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक जय मांडवकर या खेळाडूंना प्रत्येकी कुलर देऊन सन्मानित करण्यात येणार आले.



## रियाश चौगुले अंतिम विजेता

**नवी दिल्ली :** बुद्धीच्या बळावर डिवाइन पॅराडाईज हायस्कूल कल्याण चिंचपाडा पूर्वचा विद्यार्थी रियाश चौगुलेने समोरच्या राजाला चितपट करत इंटरस्कूल चेस टूर्नामेंटमध्ये रियाश अंतिम विजेता ठरला. इंटर स्कूल बुद्धिबळ स्पर्धा कल्याण-डोंबिवली मधील ३० शाळांनी भाग नोंदविला होता त्यामध्ये डिवाइंड पॅराडाईज हायस्कूलचे अकरा विद्यार्थी सहभाग झाले. इयत्ता पहिली ते दुसरी स्पर्धेमध्ये संविधान गोरखनाथ केदारे तिसऱ्या क्रममांकाचा मानकरी ठरला. इयत्ता पाचवी ते सहावी स्पर्धेमध्ये डिवाईन पॅराडाईज हायस्कूल चिंचपाडा कल्याण शाळेचा विद्यार्थी रियाश चौगुले याने प्रथम क्रमांक मिळवून अंतिम विजेता ठरला. पिया नायर हिने तिसरा क्रमांक पटकावला तसेच इयत्ता सातवी ते आठवी स्पर्धेमध्ये समयका केदारे हिने तिसरा क्रमांक पटकावला.

### आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धा

# टीम ऑफ द टूर्नामेंट जाहीर

**| मुंबई | प्रतिनिधी |**

भारतीय संघ यंदाच्या टी-२० विश्वचषक २०२६ चा विजेता ठरला आहे. टीम इंडियाने अंतिम सामन्यात न्यूझीलंडचा तब्बल ९६ धावांनी पराभव करत विक्रमी तिसऱ्यांदा ट्रॉफीवर नाव कोरलं आहे. संजू सॅमसन या स्पर्धेचा प्लेअर ऑफ द टूर्नामेंट ठरला. यासह आता आयसीसीने टी-२० विश्वचषक २०२६ च्या टीम ऑफ द टूर्नामेंटची घोषणा केली आहे. ज्यामध्ये भारताच्या ४ खेळाडूंचा समावेश आहे, पण विश्वचषक विजेता कर्णधार सूर्यकुमार यादवचा मात्र यात समावेश नाही, या संघाचा कर्णधार आयसीसीच्या टीम ऑफ द टूर्नामेंटचा कॅप्टन आहे.

आयसीसीच्या टीम ऑफ द टूर्नामेंटमध्ये सर्वाधिक विश्वविजेत्या भारतीय संघाच्या खेळाडूंचा समावेश आहे. चार भारतीय खेळाडू या संघात आहेत, तर दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडचे प्रत्येकी दोन खेळाडू आहेत. आयसीसीने या संघात पाकिस्तान, झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिजमधील प्रत्येकी एका खेळाडूचा समावेश केला आहे. उपविजेत्या न्यूझीलंड संघातील एकाही खेळाडूचा या संघात समावेश नाही.




टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये सर्वाधिक धावा करणारा पाकिस्तानचा साहिबजादा फरहान आणि प्लेअर ऑफ द टूर्नामेंट असलेला संजू सॅमसन यांची सलामी जोडी म्हणून निवड करण्यात आली आहे. तिसऱ्या क्रमांकासाठी इशान किशनचा संघात समावेश आहे. इशान स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा चौथा फलंदाजदेखील आहे. स्पर्धेच्या गट टप्प्यात शानदार गोलंदाजी करणाऱ्या अमेरिकेच्या शॅडली शान शाल्कविकला १२ वा खेळाडू म्हणून स्थान मिळालं आहे.

२०२६ च्या टी-२० विश्वचषकातील कामगिरीच्या आधारे आयसीसीच्या संघात चार भारतीय खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. हार्दिक पंड्या, संजू सॅमसन आणि इशान किशन यांच्यासह स्पर्धेत सर्वाधिक विकेट्स घेणारा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहचा समावेश आहे. बुमराहने स्पर्धेत सर्वाधिक १४ विकेट्स घेतल्या आहेत. सुपर-८ टप्प्यात पोहोचलेल्या झिम्बाब्वे संघातील ब्लेसिंग मुझारबानीची आयसीसी संघात निवड करण्यात आली आहे. आयसीसीच्या टीम ऑफ द टूर्नामेंट संघाचा कर्णधार म्हणून दक्षिण आफ्रिकेच्या एडन मारक्रमची निवड करण्यात आली आहे.

# टीम इंडिया सिक्सर किंग



**| अहमदाबाद | वृत्तसंस्था |**

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वातील भारतीय संघाने रविवारी न्यूझीलंडला नमवत टी २० जेतेपदावर कब्जा केला. भारतीय संघाचे टी २० प्रकारातले हे तिसरे जेतेपद आहे तर आयसीसी स्पर्धेचे आठवे. या जेतेपदाचं ठळक वैशिष्ट्य म्हणजे टीम इंडियाने पाडलेला षटकारांचा पाऊस. भारतीय फलंदाजांनी स्पर्धेदरम्यान तब्बल १०६ षटकार चोपल्याचं स्पष्ट झालं आहे. बाकी कोणत्याही संघापेक्षा हे प्रमाण काही पटींनी जास्त आहे. सर्वाधिक षटकारांच्या यादीत भारतीय संघानंतर वेस्ट इंडिज ७६ षटकारांसह दुसऱ्या स्थानी आहे. दक्षिण आफ्रिकेचा संघ ७२ षटकारांसह तिसऱ्या स्थानी आहे.

षटकारांच्या माध्यमातून भारतीय संघाने ६३६ धावा चोपून काढल्या. टी २० प्रकारात षटकारांचं महत्त्व अनोखं आहे. धावांचा पाठलाग असो किंवा मोठी धावसंख्या रचणे असो, षटकाराच्या माध्यमातून झटपट धावा करता येतात. मात्र षटकार लगावणं हे स्वतंत्र कौशल्य आहे. टी २० प्रकारात यशस्वी व्हायचं असेल षटकार कळीचे असतील हे भारतीय संघाने ओळखलं आणि त्यावर भर दिला. या धोरणाचा निश्चित फायदा भारतीय संघाला झाला आहे. संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि इशान किशन या त्रिकुटाने सातत्याने षटकारांचा रतीब घालत प्रतिस्पर्ध्यांना नामोहरम केलं. भारतीय संघाने पॉवरप्ले, मधली षटकं आणि हाणामारीची षटकं अशा तिन्ही टप्प्यांमध्ये षटकारांच्या बाबतीत श्रीलंका आणि झिम्बाब्वे हे दोन संघ तळाच्या स्थानी आहेत. या दोन्ही संघांनी ३७ षटकार वसूल केले. योगायोग म्हणजे या दोन्ही संघांना सुपर ८ फेरीचा अडथळा पार करता आला नाही.

### चौकार-षटकाराच्या माध्यमातून वसूल केल्या १२२४ धावा

दर दहा चेंडूमागे भारतीय फलंदाजांनी षटकार वसूल केला आहे. चौकारांच्या बाबतीतही भारतीय संघ अव्वल ठरला आहे. भारतीय फलंदाजांनी स्पर्धेदरम्यान १४७ चौकार लगावले आहेत. ११७ चौकारांसह न्यूझीलंडचा संघ दुसऱ्या तर ११२ षटकारांसह इंग्लंडचा संघ तिसऱ्या स्थानी आहे.

भारतीय संघाने चौकारांच्या माध्यमातून १२२४ धावा केल्या आहेत. भारतीय संघाने केलेल्या एकूण धावांच्या तुलनेत यांचं प्रमाण ७० टक्के आहे. वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सेमी फायनलच्या लढतीत भारतीय संघाने चौकार आणि षटकारांच्या माध्यमातून ३७ धावा केल्या.

## शिवांजली क्रिकेट संघ, म्हसळा गौळवाडी आयोजित भव्य क्रिकेट स्पर्धा उत्साहात संपन्न

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

शिवांजली क्रिकेट संघ, म्हसळा गौळवाडी यांच्या वतीने नारगी मैदान विरार येथे रविवारी (दि.८) भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात व खेळाडूंच्या दमदार कामगिरीने यशस्वीरीत्या पार पडली.

स्पर्धेत सामाजिक स्तरावर अनेक संघांनी उत्साहाने सहभाग घेत स्पर्धेची रंगत वाढवली.या स्पर्धेत सायगाव संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. तर वांजळे संघाने द्वितीय क्रमांक, नेवरूळ संघाने तृतीय क्रमांक आणि खामगाव संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला. तसेच स्पर्धेचे विशेष आकर्षण ठरलेल्या म्हसळा श्रीवर्धन या दोन संघांमधील मैत्रीपूर्ण सामन्यात म्हसळा संघाने शानदार विजय मिळवून विजेतेपद पटकावले.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व देणगीदारांचे आयोजकांनी मनःपूर्वक आभार मानले. तसेच शिवांजली क्रिकेट संघाचे सर्व कार्यकर्ते, सहकारी तसेच स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मदत करणाऱ्या सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले. सर्वांच्या सहकार्यामुळेच ही स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्याचे आयोजकांनी सांगितले.

## कुलदीप यादवचे मसूरीमध्ये लग्न

**कानपूर :** फिरकी गोलंदाज कुलदीप यादव त्याची बालपणीची मैत्रीण वंशिका हिच्याशी लग्न करणार आहे. दोघे १४ मार्च रोजी उत्तराखंडमधील मसुरी येथे सात फेरे घेतील. कुलदीपचे वडील राम सिंह यादव यांनी लखनऊमध्ये मुख्यमंत्री योगी यांना लग्नाचे आमंत्रण दिले. कुलदीप आणि वंशिका यांनी ४ जून २०२५ रोजी साखरपुडा केला होता, ज्यात रिंकू सिंग, प्रिया सरोज यांच्यासह अनेक लोक उपस्थित होते.

## गॅरी कर्स्टन होणार श्रीलंकेचे प्रशिक्षक

**कोलंबो :** गॅरी कर्स्टन आता श्रीलंकेचे प्रशिक्षक असणार आहेत. नुकत्याच आटोपलेल्या टी २० वर्ल्डकप स्पर्धेत यजमान श्रीलंकेला सुपर ८ फेरीतून गाशा गुंडाळावा लागला होता. या पराभवानंतर प्रशिक्षक सनथ जयसूर्या यांनी प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला. १५ एप्रिलपासून कर्स्टन पदभार स्वीकारतील. श्रीलंका क्रिकेट बोर्डाने इन्स्टाग्रामच्या माध्यमातून ही माहिती दिली. दोन वर्षांसाठी कर्स्टन प्रशिक्षक म्हणून कार्यरत असतील. १४ एप्रिल २०२८ कर्स्टन यांचा कार्यकाळ संपेल. २०२७ वनडे वर्ल्डकपसाठी श्रीलंका संघाची मोट बांधणे हे कर्स्टन यांच्यापुढचं आव्हान असणार आहे.

# महिला शक्ती ४०+चषक स्पर्धा

**| कर्जत | प्रतिनिधी |**

महिला दिनाचे औचित्य साधुन आयोजित केलेल्या कर्जत ४० + क्रिकेट संघटना व इलेव्हन स्टार संघ दहिवली -कर्जत आयोजित महिला शक्ती ४०+चषक स्पर्धा बाममळा मैदान दहिवली येथे यशस्वीरित्या संपन्न झाली.

दरवर्षी कर्जत ४० + क्रिकेट संघटना विविध सामाजिक संकल्पनेवर आधारित समाजासाठी एक संदेश देण्याच्या उद्देशाने स्पर्धा आयोजित करत आलेले आहोत. यावर्षी आपल्या समाजातील तसेच परिवारातील महिलांचा सन्मान म्हणून त्यांच्या नावाने ही स्पर्धा समर्पित करण्यात आली.



महिला क्रिकेटला प्रोत्साहन म्हणुन स्पर्धेला सुरुवात करताना कंपनी डोलवी, पेण व कर्जत महिला संघ यांच्या बरोबर एक प्रेक्षणीय सामना आयोजित केला होता. त्यामध्ये कर्जत महिला संघाने हा सामना जिंकुन कर्जतमधील महिला व मुलींचा संघ हा काही कुठे कमी नाही हे दाखवून दिले.

स्पर्धेला कर्जत नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्षा पुष्पा दगडे, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, नगरसेवक राजाभाऊ कोठारी, दहिवली गाव परिसर विचारमंचचे सुनील जाधव, नगरसेविका सुचिता देवेंद्र खोत, अंजली कडु, हर्षाली गायकवाड, मानसी कानिटकर, महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, माजी नगराध्यक्षा रजनी रामदास गायकवाड, माजी नगरसेविका सुवर्णा नीलधे यांनी सदिच्छा भेट दिली. त्यावेळी संघटनेतर्फे सर्व नगरसेवक नगरसेविकांचे व मान्यवरांचा यथोचित सन्मान सत्कार करण्यात आला.

स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे संघटनेच्या ब्रीद वाक्याप्रमाणे एक धाव आरोग्यासाठी व पुन्हा एकदा तारुण्याकडे तसेच खेळामधून एक पाऊल समाजासाठी म्हणुन स्पर्धेला रोख रक्कम न ठेवता फक्त आकर्षक चषक ठेवण्यात आले होते.

## मराठी ऑलिम्पियाड मितल वावेकर यांचे यश

**तळे :** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्यामार्फत दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय मराठी ऑलिम्पियाड स्पर्धेत मितल वावेकर रायगड जिल्हा परिषद शाळा तळे मराठी तालुका तळा यांनी आठवा क्रमांक संपादन करून राज्यात आपल्या तालुक्याचे नाव उंचावले आहे.

चालू शैक्षणिक वर्षात संपूर्ण राज्यभर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, अधिकारी, पर्यवेक्षीय अधिकारी यांच्यामध्ये व्यावसायिक विकासासाठी तसेच शैक्षणिक व प्रशासकीय कौशल्य वृद्धिंगत करून स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करण्यासाठी एकूण ४२ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत वावेकर या केंद्रस्तर, तालुकास्तर, विभाग स्तरावर प्रथम क्रमांक पटकावून राज्य स्तराकरता पात्र ठरल्या.

तत्पूर्वी मुंबई विभागातून ८० गुण मिळवून त्यांनी विभाग स्तरीय प्रथम क्रमांक पटकावला होता. राज्यस्तरावर ७५.५ गुण मिळवून त्या आठव्या क्रमांकावर विजयी ठरल्या. यापूर्वी जिल्हास्तरीय नवोपक्रम स्पर्धेत तृतीय क्रमांक तसेच निपुण महाराष्ट्र अंतर्गत तालुकास्तरीय स्पर्धामध्ये त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे.

# तुषार सिनलकर आंतरराष्ट्रीय तायक्कांदो पंच म्हणून चमकले

**| रसायनी | प्रतिनिधी |**

तुषार तानाजी सिनलकर, चार डॅन ब्लॅक बेल्ट आणि आंतरराष्ट्रीय पंच यांनी काठमांडू येथे झालेल्या प्रतिष्ठित माउंट एव्हरेस्ट आंतरराष्ट्रीय तायक्कांदो चॅम्पियनशिप २०२६ मध्ये आंतरराष्ट्रीय पंच म्हणून यशस्वीरित्या काम पाहिले.

जागतिक तायक्कांदोने मान्यता दिलेल्या या जी-१ मानांकित स्पर्धेमध्ये अनेक देशांतील अव्वल क्रमांकाचे खेळाडू सहभागी झाले होते. सिनलकर यांनी उत्तम कामगिरी आणि अचूकतेने आपली कर्तव्ये पार पाडली आणि स्पर्धेदरम्यान त्यांच्या उत्कृष्ट पंचगिरीबद्दल आयोजक आणि अधिकाऱ्यांकडून कौतुकाची थाप मिळाली.




तुषार यांनी व्हिएतनाममधील हो ची मिन्ह सिटी येथे २६ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित जागतिक तायक्कांदो आंतरराष्ट्रीय रेफरी रिफ्रेशर कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केला, जिथे त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आणि जागतिक तायक्कांदोच्या अद्ययावत नियमांसह आंतरराष्ट्रीय रेफरी म्हणून त्यांची ओळख आणखी मजबूत केली.

तायक्कांदो क्षेत्रातील प्रमुख व्यक्तींनी सिनलकर यांचे त्यांच्या यशाबद्दल अभिनंदन केले. इंडिया तायक्कांदोचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर आणि महाराष्ट्र तायक्कांदो असोसिएशनचे अध्यक्ष संदीप ओंबासे, सचिव गफ्फार पठाण आणि कोषाध्यक्ष डॉ. प्रसाद कुलकर्णी यांचा समावेश आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील अधिकाऱ्यांनी, तायक्कांदो खेळातील अनेकांनी आणि गुरुकुल तायक्कांदो अकादमीचे विद्यार्थी आणि पालकांनीही तुषार सिनलकर यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत त्यांना पुढील यश मिळावे अशी शुभेच्छा दिल्या. तुषार अनेक वर्षांपासून प्रशिक्षक, पंच आणि मार्गदर्शक म्हणून तायक्कांदोच्या विकासात सक्रिय योगदान देत आहेत. त्यांच्या अकादमी, फेडरेशन आणि आंतरराष्ट्रीय कामगिरीद्वारे, ते खेळाला प्रसारीत करत असून तरुण खेळाडूंना उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रोत्साहित करतात.

### पीरवाडी ते जेएनपीए बंदर अंतर केले पार | ४ तास ४९ मिनिटे ५० सेकंदाचा लावला वेळ

# केगाव-उरणच्या जयेश पाटीलची यशस्वी सागरी झेप

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

केगाव येथील मानस जयेश पाटील या सहा वर्षीय चिमुरड्याने पीरवाडी बीच ते जेएनपीए बंदर हे १७ किमी सागरी अंतर ४ तास ४९ मिनिटे आणि ५० सेकंदात पार केले. चिमुरड्याच्या धाडसाचे परिसरातून कौतुक केले जात आहे.

केगाव-उरण येथील जयेश पाटील यांचा सहा वर्षीय मानस हा मुलगा आहे. पोहण्याची आवड असलेल्या मानसला पीरवाडी बीच ते जेएनपीए बंदर दरम्यानच्या अरबी समुद्रात पोहण्यास उतरविण्याचा इच्छा मानसच्या आईवडिलांनी प्रशिक्षक संतोष पाटील यांच्याकडे व्यक्त केली होती. इच्छा व्यक्त करताच प्रशिक्षक संतोष पाटील यांनीही मानसला पोहण्याचे धडे देण्यास सुरुवात केली होती. प्रशिक्षणाला वर्षाचा कालावधी लागला असता. मात्र मानसच्या अफाट प्रतिसादामुळे चार महिन्यांच्या प्रशिक्षणातच त्यांनी बलाढ्य लाटांचा सामना कसा करायचा, प्रतिकुल हवामान आणि



समुद्राच्या उलट-सुलट प्रवाहात कसे पोहायचे याचे शास्त्रोक्त पद्धतीचे प्रशिक्षण दिले. ते त्यांनी चांगल्या प्रकारे आत्मसातही केले. प्रशिक्षणानंतर पोहण्यात मानस तरबेज झाल्याची खात्री पटल्यानंतर मानसला पीरवाडी बीच ते जेएनपीए बंदर हे १७ किमी सागरी अंतरासाठी पोहण्यासाठी सज्ज केले. यासाठी त्यांनी ६ मार्चच्या तारखेचा दिवसही नक्की केला. या मोहिमेसाठी येथील जीटीआय कंटेनर टर्मिनलनेही मदतीसाठी पुढे केला.

शुक्रवारी (६) मानस पीरवाडी बीचवरुन समुद्रात झेपावला. पीरवाडी बीच नागाव, केगाव ते जेएनपीए बंदर या सागरी अंतरा दरम्यान क्षणाक्षणाला उलटसुलट वाहाणाऱ्या प्रवाहामुळे अत्यंत धोकादायक मानला जातो.तसेच या दरम्यान सातत्याने अवाढव्य आणि अजस्त्र मालवाहू जहाजांच्या वाहतुकीच्या वर्दळीमुळे आणखीनच आव्हानात्मक ठरतो.

अशा या धोकादायक समुद्रात झेपावलेल्या मानसने पीरवाडी बीच ते जेएनपीए बंदर हे सागरी अंतर कापण्यास सुरुवात केली होती. मात्र अनुकूल परिस्थिती आणि चिअर अप, प्रोत्साहन देण्यासाठी आलेले कुटुंबिय यांच्या जोरावर सहा वर्षीय चिमुरड्यांने पीरवाडी बीच ते जेएनपीए बंदर हे १७ किमी सागरी अंतर ४ तास ४९ मिनिटे आणि ५० सेकंदात पार केले.

छत्रपती शिवाजी महाराज की जय चा घोष करीत मानसनेही आपला आनंद व्यक्त केला. चिमुकल्याच्या या धाडसाचे परिसरातील अनेकांकडून कौतुक केले जात आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयआेनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)